दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४६ | शुक्रवार, दि.११ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### मनी पॉलिसी म्हणजे भारत थांबणार नाही अशीच

आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी देशातील लाखो कर्जदारांना दिलासा देणारी घोषणा केली आहे. बुधवारी बैठकीत रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कपात केली आहे. रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारीमध्ये झालेल्या पहिल्या पतधोरण समिती बैठकीत व्याजदरात कपात केली होती. आरबीआयने व्याजदरात ०.२५ टक्के कपात केली होती तर, आता रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने सलग दुसऱ्यांदा कर्जदारांना व्याजदर कपातीची भेट दिली आहे. यासह आता रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट ६.२५ टक्क्यांवरून ६.०० टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. याचा अनेक मध्यमवर्गीयांना लाभ होणार आहे.

# सरकारचे १०० दिवस पूर्ण तरी कर्जमाफी नाही



## बच्चू कडू आक्रमक, आज कृषीमंत्र्यांच्या दारातच पेटवणार मशाल

**नाशिक । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी बच्चू कडू पुन्हा सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. कर्जमाफीसाठी ते आता मशाल आंदोलन करणार आहेत. त्यांच्या या आंदोलनाची राज्यभरात चर्चा आहे.**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या नाशिकमधील निवासस्थानासमोर शुक्रवारी रात्री (११ एप्रिल) मशाल पेटवून बच्चू कडू आंदोलन करणार आहेत. दुसरीकडे राज्यभरातील प्रहारचे कार्यकर्ते सत्ताधारी आमदारांच्या घरासमोर मशाल पेटवून आंदोलन करणार आहेत. सरकारने निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, परंतु शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही त्यामुळे बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे. ज्या सरकारच्या धोरणामुळे आमच्या शेतकऱ्यांच्या घरातील दिवे विझायला लागले त्या विरोधात आम्ही आंदोलन करू, असे कडू म्हणाले. शेतकऱ्यांचे पालकत्व ज्यांच्याकडे आहे ते कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या घरासमोर मशाल पेटवून आंदोलन करणार आहे. हातात मशाल, गळ्यात निळा दुपट्टा आणि भगवा झेंडा घेऊन आम्ही आंदोलन करू असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बच्चू कडू पुन्हा सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. महायुतीत ते गेल्यावेळी मंत्री होते.

पान २ वर

# खून, खंडणीशी संबंध नाही ; मला दोषमुक्त करा !

## वाल्मिक कराडकडून न्यायालयाकडे दोषमुक्तीचा अर्ज सादर





### वाल्मिकला वाचविण्यासाठी वकिलांची फौज मात्र तपास यंत्रणेकडे पुरावे

वाल्मीक कराड यांच्या वकिलांनी आमचा या गुन्ह्याशी संबंध नाही असे म्हणत डिस्चार्ज ॲप्लिकेशन दिले आहे. त्यावरतीही धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली. ''वाल्मिक कराडला वाचविण्यासाठी वकिलांची फौज उभी केली जात आहे. मात्र तपासी यंत्रणेकडे वाल्मीक कराडचा या खंडणी आणि खून प्रकरणात काय सहभाग आहे, याचे पुरावे आहेत. हे पुरावे २४ तारखेला दिले जातील. आरोपींना फासावर लटकेपर्यंत आम्ही पाठपुरावा सोडणार नाहीत'', असे देशमुख म्हणाले.

**बीड । प्रतिनिधी**


**खून आणि खंडणी प्रकरणात माझा सहभाग नसल्याने मला दोषमुक्त करा, अशी मागणी सरपंच हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडने केली. देशमुख खुनात माझ्या विरोधात पुरावा नाही. सहभाग असल्याचेही सिद्ध होत नाही. त्याशिवाय, मी खंडणी मागितल्याचेही समोर आले नाही, असे कराडने आपल्या दोषमुक्तीच्या अर्जात म्हटले आहे. तुरुंगातून बाहेर येण्यासाठी वाल्मिकने ही चाल खेळल्याचे बोलले जाते. पुढील सुनावणीत यासंबंधी अधिक विस्तृतपणे न्यायालयात म्हणणे मांडले जाईल, असे वाल्मिक कराडच्या वकिलांनी सांगितले.**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात गुरुवारी दि.१० एप्रील रोजी सुनावणी झाली. जिल्हा न्यायाधीश व्यंकटेश पाटवदकर यांच्यासमोर सुनावणी संपन्न झाली. वाल्मीक कराडचे वकील विकास खाडे न्यायालयात उपस्थित होते तर विशेष सरकारी ॲड.वकील उज्वल निकम आणि त्यांचे सहकारी वकील ॲड. बाळासाहेब कोल्हे हे देखील न्यायालयात दाखल होते.

पान २ वर

# राज्यातील धरणांत ४२ टक्के पाणीसाठा

## २२३ टँकर द्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात उन्हाचा तडाखा वाढल्यामुळे धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत चालली आहे. सध्याच्या घडीला राज्यातल्या तब्बल चौदा जिल्ह्यातील ७८४ गावे आणि वाड्यांची तहान टँकरच्या पाण्यावर भागवण्याची वेळ आली आहे. सध्याच्या घडीला गावकऱ्यांच्या पाण्याची तहान भागवण्यासाठी २२३ टँकर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करीत आहेत.**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पाण्याचे दुर्भिक्ष जाणवण्यास सुरवात झाली आहे. राज्यातल्या सुमारे तीन हजार धरणांमधील पाण्याचा साठाही झपाट्याने खालावत आहे. सध्याच्या घडीला या सर्व धरणातील पाणीसाठा फक्त ४२.८६ टक्क्यांवर आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पाणी

पान २ वर

### सर्वाधिक टँकर पुण्यात

सध्या सर्वाधिक म्हणजे पुण्यात ६५ टँकर धावत आहेत त्याखालोखाल साताऱ्यात ४० टँकर गावागावात पाणी पुरवठा करीत आहेत. मागील आठवड्यात राज्यात १७८ टँकर पाणी पुरवठा करण्यासाठी धावत होते पण आता हा आकडा वाढला असून सध्याच्या घडीला २२३ टँकर पाणी पुरवठा करीत आहेत.

# वक्फ दुरुस्ती कायद्या विरोधातील याचिकांवर १६ एप्रिलला सुनावणी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**वक्फ दुरुस्ती कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर १६ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या खंडपीठासमोर वक्फ कायदा प्रकरण सूचीबद्ध करण्यात आले आहे. इंडिया आघाडीतील काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष यांच्यासह एआयएमआयएम या पक्षांनी आणि इतर सामाजिक संघटनांनी वक्फ दुरुस्ती कायद्याच्या विरोधात १० पेक्षा अधिक याचिका दाखल केल्या आहेत.**

सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळानुसार, सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन

पान २ वर

### भाजप देशभरात राबवणार वक्फ दुरुस्ती जागरुकता अभियान

भाजप २० एप्रिल ते ५ मे पर्यंत वक्फ दुरुस्ती जागरूकता अभियान देशभरात राबवणार आहे. वक्फ दुरुस्ती कायद्यातील सुधारणांच्या फायद्यांची माहिती मुस्लीम समाजाला देणे. वक्फ दुरुस्ती कायद्याविरोधात काँग्रेस आणि विरोधी पक्षांकडून जे बोलले जात आहे. त्याविरोधात नागरिकांमध्ये जागरुकता करणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. या अभियानाची तयारीसाठी राजधानी दिल्लीतील भाजप मुख्यालयात एका कार्यशाळेचे आयोजनही करण्यात आले होते. या कार्यशाळेला भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरण रिजेजू यांनी संबोधित केले.

## भारताकडून बांगलादेशची सवलत रद्द


**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारताकडून बांगलादेशला मिळणारी 'ट्रान्सशिपमेंट' सवलत आता रद्द करण्यात आली आहे. बांगलादेशने चीनशी जवळीक वाढविण्याचा प्रयत्न चालविला असून आपल्या क्षेत्रात चीनला आमंत्रित केले आहे यामुळे हा निर्णय घेण्यात आला असून याचा बांगलादेशला तोटा होणार हे निश्चितपणे मानले जात आहे. बांगलादेशचे सर्वोच्च नेते मोहम्मद युनुस यांनी काही दिवसांपूर्वी चीनचा दौरा केला होता. चीनने ईशान्य भारत ताब्यात घ्यावा. या भागात आपली आर्थिक व्यवस्था निर्माण करावी. बांगला देश हा बंगालच्या उपसागराचा एकमेव स्वामी असल्याने आपण चीनला याकामी साहाय्य करु, अशी प्रक्षोभक आणि चिथावणीखोर भाषा त्यांनी चीन दौऱ्यावर केली होती. त्यामुळे भारत संतप्त झाला होता.

# २६/११ चा आरोपी तहव्वुर राणाला घेवून एनआयए पथक दिल्लीत दाखल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**मुंबई दहशतवादी हल्ल्यातील दोषी तहव्वुर राणाला गुरूवारी भारतात आणण्यात आले. एनआयए आणि गुप्तचर संस्था रॉ यांचे संयुक्त पथक बुधवारी एका विशेष विमानाने दाखल झाले. त्याला कडक सुरक्षेत भारतात आणले गेले.**



एनआयए आणि रॉ टीमच्या सुरक्षेत ते दुपारी एका खास विमानाने दिल्ली विमानतळावर उतरले. भारतात पोहोचताच एनआयए टीमने त्याला अधिकृतपणे ताब्यात घेतले. यानंतर, राणाला बुलेटप्रूफ कारमधून एनआयए मुख्यालयात नेण्यात आले. यावेळी एनआयए मुख्यालयाकडे जाणारा रस्ता पोलिसांनी बंद केला होता. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाला सतर्क ठेवण्यात आले होते शिवाय विमानतळावर (विशेष शस्त्रे आणि रणनीती)

पान २ वर

## 'फुले' चित्रपटाच्या आक्षेपावरून, सेन्सॉर बोर्डाची मानसिकता लक्षात येते – जयंत पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून या ना त्या निमित्ताने सेन्सॉर बोर्ड वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. फुले चित्रपटाच्या निमित्ताने सेन्सॉर बोर्ड पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. फुले चित्रपटावर काही संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर फुले चित्रपटातील काही दृश्यांबाबत सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष



जयंतराव पाटील यांनी यावरून नाराजी व्यक्त केली आहे.

पान २ वर

## वडवणीत उपनगराध्यक्षासह नगरसेवक, माजी नगरसेवकावर गुन्हे दाखल

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील स्व. वसंतराव नाईक चौक याठिकाणी मंगळवार रोजी संध्याकाळच्या दरम्यान चौकात दोन गटात तुफान हाणामारीची घटना घडली होती. यात दिवसभर तणाव पुर्वक वातावरण पाहवयास मिळाले तर रात्री उशीरा या प्रकरणी परस्पर गुन्हे दाखल झाले. यामध्ये वडवणी न.प. उपनगरध्यक्षसह नगरसेवक आणि माजी नगरसेवकासोबत दोन्ही गटातील तब्बल १८ जणांचा समावेश आहे. वडवणी शहरातील स्व. नाईक चौक

पान २ वर

### आज वडवणी शहर बंदचे आवाहन

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे वडवणी शहरातील नाईक चौकाचे सुशोभीकरणाचे काम सुरू असताना वाद निर्माण झाला होता. यात बंजारा समाजाचे काही तरुण जखमी झाले आहेत. सदरील घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी दि. ११ एप्रिल रोजी वडवणी शहर बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या बंदमध्ये वडवणी तालुक्यातील आणि जिल्हाभरातील समाज बांधवांनी सहभागी व्हावे व या बंदला व्यापारी बांधवांनी सहकार्य करावे, असे आव्वाहन बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुख्य आरोपी निघाला पोलिस हवालदार, १७ कोटींचे ड्रग्ज जप्त

**लातूर । प्रतिनिधी**

चाकूर तालुक्यातील रोहिणी शिवारात ड्रग्जचा कारखाना उभारल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. कारखान्यावर धाड टाकून पोलिसांनी ११ किलो ड्रग्स जप्त केले. या ड्रग्सची आंतरराष्ट्रीय बाजारात १७ कोटी रुपये किंमत असल्याचे बोलले जात आहे. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे, याप्रकरणी अटक केलेल्या आरोपींपैकी मुख्य आरोपी मुंबई पोलिस दलातील कर्मचारी आहे. प्रमोद केंद्रे, असे त्याचे नाव असून तो आपल्या साथीदारांच्या मदतीने मुंबईतच या ड्रग्सची विक्री करत असे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद केंद्रे हा मुंबई पोलिस दलात कार्यरत होता. त्यावेळी त्याची मुंबईतल्याच एका ड्रग्ज तस्कराशी ओळख झाली आणि त्यानेच केंद्रेला ड्रग्ज तयार

पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५.५० क्विंटल | २,५१७ | ३,१०० | २,६७९ |
| ज्वारी/हायब्रिड : १६६.५० क्विंटल | १,७३१ | २,९५१ | २,४२१ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ५३.०० क्विंटल | ६,७५० | ७,१०० | ६,९४५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३५.५० क्विंटल | २,२४० | २,८१२ | २,४९५ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,१५० | ४,३५० | ४,२७५ |
| हरभरा: ३६.०० क्विंटल | ५,४५० | ५,५५१ | ५,५०२ |

# बँकांमध्ये मराठीचा वापर न झाल्यास आंदोलन तीव्र करू

## राज ठाकरे यांचे इंडियन बँक असोसिएशनला पत्र



**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात मराठी भाषेच्या वापराचा मुद्दा सध्या चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी इंडियन बँक असोसिएशनला पत्र लिहून बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आपल्या सेवांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली आहे. मराठीचा वापर न झाल्यास मनसे आपले आंदोलन तीव्र करेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.**

बुधवारी (९ एप्रिल) मनसे नेत्यांनी आयबीएला सुपूर्द केलेल्या पत्रात राज ठाकरे म्हणाले, ''बँकांनी आपल्या सेवांमध्ये तीन भाषांचा फॉर्म्युला इंग्रजी, हिंदी आणि स्थानिक भाषा (महाराष्ट्रात मराठी) यांचा वापर करावा. जर बँकांनी हे पालन केले नाही, तर येणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी संबंधित बँकांची असेल. सार्वजनिक आणि खासगी बँकांमध्ये प्रादेशिक भाषांचा वापर करण्याबाबत परिपत्रक जारी केले असून, सेवाही या तीन भाषांमध्ये द्याव्यात, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी शनिवारी राज ठाकरे यांनी पक्ष कार्यकर्त्यांना बँका आणि इतर आस्थापनांमध्ये मराठीचा वापर लागू करण्यासाठी सुरू असलेले आंदोलन तात्पुरते थांबवण्यास सांगितले होते. या मुद्द्यावर आपण पुरेशी जनजागृती केली आहे, असे ते म्हणाले होते. मात्र, आता त्यांनी पुन्हा आंदोलनाची चेतावणी दिली आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तक्रार केली आहे. त्यात म्हटले आहे, मनसे कार्यकर्ते असल्याचा दावा करणारे लोक बँकांच्या शाखांमध्ये जाऊन कर्मचाऱ्यांना धमकावत आहेत. यापूर्वी ३० मार्चला गुडीपाडव्याच्या रॅलीत राज ठाकरे यांनी अधिकृत कामकाजात मराठी अनिवार्य करण्याचा आपला

पान २ वर

## अग्रलेख

# मनी पॉलिसी म्हणजे भारत थांबणार नाही अशीच

आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी देशातील लाखो कर्जदारांना दिलासा देणारी घोषणा केली आहे. बुधवारी बैठकीत रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कपात केली आहे. रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारीमध्ये झालेल्या पहिल्या पतधोरण समिती बैठकीत व्याजदरात कपात केली होती. आरबीआयने व्याजदरात ०.२५ टक्के कपात केली होती तर, आता रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने सलग दुसऱ्यांदा कर्जदारांना व्याजदर कपातीची भेट दिली आहे. यासह आता रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट ६.२५ टक्क्यांवरून ६.०० टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. याचा अनेक मध्यमवर्गीयांना लाभ होणार आहे.

जगभर अमिरेकेने सुरु केलेले ट्रंप टेरिफ व्यापारी युद्ध आणि जगभरच्या अर्थव्यवस्था डगमगत असताना हिंदुस्थानने उचललेली आणि उचलत असलेली पावले आत्मविश्वासपूर्ण म्हटली पाहिजेत. जगाला मंदीची भीती आणि महागाईची, बेरोजगारीची धास्ती वाटत आहे. चीन आणि अमेरिका व्यापार युद्धासाठी दंड थोपटून उभे ठाकले आहेत. अमेरिकेने टेरिफ वाढवताच चीनने आपलेही टेरिफ वाढवले आहे, वाढवलेले टेरिफ २४ तासात मागे घ्या अन्यथा टेरिफ शंभर टक्क्यांनी वाढवू अशी धमकी अमेरिकेने चीनला दिली आहे पण चीन डगमगलेला नाही. आम्ही जशास तसे उत्तर देऊ असा चीनने पवित्रा घेतला आहे, जगातले लहान मोठे देश ट्रंपच्या या आणि अशा निर्णयाबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. तथापि भारताने अमेरिकेला कोणतीही विनवणी वा उत्तर न देता या संकटात संधी शोधायला सुरुवात केली आहे. रिझर्व्ह बँकेची मनी पॉलिसी हा त्याचाच भाग आहे. जेव्हा मंदी येते किंवा मंदीचे वातावरण असते तेव्हा त्यावर मात करण्यासाठी हाउसिंगला प्रोत्साहन द्यावे असे अर्थशास्त्र सांगते. घरबांधणीसाठी मजुरापासून, वायरमनपर्यंत आणि रंग, स्टील, सिमेंट, विटा, लाकूड, फर्निचर इथपासून जेवणावळीपर्यंत अनेक उद्योग व हातांना काम मिळते व अर्थव्यवस्था गतीमान होते. सर्वसामान्यांची क्रयशक्ती वाढते. बँकिंग क्षेत्रालाही वाढीचा स्कोप मिळतो, रिझर्व्ह बँकेच्या या नव्या धोरणाने ईएमआय कमी होईल आणि मंदीचा ढग बाजूला जाईल. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयासोबत आणखी एक आनंदवार्ता आली आहे ती आहे यंदा पाऊस चांगला, वेळेवर व समाधानकारक होणार. पाऊस चांगला झाला तर भारतीय शेतकरी कुणाही महाशक्तीला डरत नाही. हिंदुस्थानचे एकेकाळी इंग्लंडमध्ये गहाण पडलेले सोनं शेतकऱ्यांनी सोडवले होते हा इतिहास आहे आणि ट्रंपनी २६ टक्के टेरिफ लावले तरी भारताने त्यावर जाहीर प्रतिक्रिया दिली वा व्यक्त केलेली नाही. यातच अनेक अर्थ दडलेले आहेत. जग कोरोना महामारीत नोटा छापत चलनवाढ करत होते तेव्हा भारत या महामारीवर मात करताना लसीचा शोध, सर्वांना मोफत लस आणि सर्वांना मोफत अन्नधान्य हे निर्णय घेऊन यशस्वी झाला.

भारतीय अर्थव्यवस्था अमेरिकेतील निर्यात व आयातीवर फारशी अवलंबून नाही, भारताच्या एकुण अर्थव्यवस्थेच्या दोन टक्केही हे प्रमाण नाही. त्यामुळे ट्रंपनी कितीही आदळ आपट केली तरी भारतीय अर्थव्यवस्थेवर फार परिणाम होणार नाही असे अनेकांचे मत आहे. ओघानेच शांत डोक्याने पण निर्धाराने आपण जगावर आलेल्या या संकटात संधी शोधतो आहोत हे दिसून आले आहे. ट्रंप टेरिफ वाढवणार हे लक्षात येताच पाच जम्बो विमाने भरुन काही कोटी ॲपल फोन काही तासांत ॲपल कंपनी व भारत सरकारने अमेरिकेत पोहचवले. ते अमेरिकेत वर्षभराच्या विक्रीला पुरतील इतके आहेत. यातून जगभरच्या बड्या उद्योगांना चांगला मेसेज गेला आहे. भारत थांबणार नाही, हाच मेसेज यातून अधोरेखित झाला आहे.

अमेरिकेत जो उठाव सुरु आहे आणि जगभरच्या तेल कंपन्या, व्यापार कंपन्या, उद्योजक जी पावले उचलत आहेत ती पाहता ट्रंपना आज ना उद्या माघार घ्यावी लागेल हे स्पष्ट होते. ट्रंप यांचे मित्र व सल्लागार इलॉन मस्क यांचीही चरबी या व्यापार युद्धात पातळ झाली आहे. त्यांनी आपली भूमिका बदलली आहे. भारताने गेली काही वर्षे जगभरातील लहान मोठ्या देशांशी जे मैत्रीपूर्ण संबंध जपले आहेत ते आता रंग आणतील अशी चिन्हे आहेत. भारताची निर्यात या छोट्या छोट्या देशांना वाढेल, रशिया भारतासोबतचा कायमचा मित्र आहेच. जे गाव करील ते राव करीत नाही याची अमेरिकेला प्रचिती येईल. मुळात अमेरिका देश अनेक गोष्टीसाठी जगावर अवलंबून आहे. जग त्यांना नमवेल हे वेगळे सांगायला नको. तूर्त भारत फारसा न गोंधळता निश्चित निर्धाराने पावले टाकताना दिसतो आहे. जोडीला रिझर्व्हने रेपोदर कमी करत दिलासा दिला आहे. ईएमआय कमी होऊन हाऊसिंग व शेतीला कमी व्याजाने कर्ज उपलब्ध होते आहे. पाऊसमान चांगले असणार असे भाकीत आहे. या सर्वाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर उत्तम परिणाम होईल.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित रहा-अजिंक्य सुरवसे

**बीड । प्रतिनिधी**

**महिला शिक्षणाचे आद्यजनक, दलितांच्या व्यथा मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र परिश्रम करणारे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती गुरुवार दि. ११ एप्रिल २०२४ रोजी समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे . यावेळी जिल्ह्यामध्ये प्रथमच चित्ररथ मिरवणूक देखील आयोजित करण्यात आलेली या चित्ररथ यात्रेच्या माध्यमातून क्रांतीसुर्य महात्मा फुले यांचा जीवन संघर्ष आढावा तमाम फुले प्रेमींसाठी तसेच सर्वसामान्यांसाठी एक आदर्श दाई उपक्रम या चित्ररथ मिरवणुकीच्या माध्यमातून ठरला जाणार आहे. फुले जयंती जिल्ह्यात देखील ठीकठिकाणी, गावा-गावात, घरा-घरात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करावी असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सचिव ॲड.सुभाष राऊत यांनी केले आहे. बीड शहरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या जयंती महोत्सवाचे साक्षीदार तमाम ओबीसी बहुजन बांधवांनी व्हावे असे आवाहन सार्वजनिक जयंती महोत्सवाचे अध्यक्ष सुरवसे यांनी केले आहे.**



प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती बीड शहरामध्ये समता परिषदेच्या माध्यमातून साजरी होत असून सकाळी नऊ वाजता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याजवळ, डीपी रोड, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स, बीड या ठिकाणी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तर सायंकाळी चार वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. दरम्यान तत्पूर्वी दिनांक ११ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ०९:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून समता ज्योत काढण्यात येणार असून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्याजवळ या समता ज्योत रॅलीची सांगता होणार आहे. समता ज्योत रॅलीमध्ये फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येणार आहे. तरी महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी, ओबीसी समाजातील विविध संघटनेचे पदाधिकारी, समता सैनिक, फुले प्रेमी, बंधू-भगिनींनी आणि युवक युवतींनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सर्व उपक्रमांना उपस्थिती लावावी असे आवाहन सार्वजनिक महात्मा ज्योतिबा फुले जयंती महोत्सवाचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे यांनी केले आहे. क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले जयंती मोहत्सवानीमित्त चित्र रथ मिरवणूकीचे बीड जिल्ह्यात प्रथमच जयंती निमित्त आयोजन केले गेले आहे. या मिरवणुकी वेळी महामंवांच्या जिवनकार्यावर आधारित चित्र रथ मिरवणूक काढण्यात येत आहे. क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांनी त्यांच्या जिवनात केलेल्या प्रमुख कार्यापैकी मुलींसाठी शिक्षणाची जी दारे खुली केली त्या कार्यावरती आधारित भव्य दिव्य चित्रीत असा देखावा उभारण्यात येत आहे तो या मिरवणुकीचे आकर्षण असणार आहे.

# भगवान महावीर स्वामींच्या आदर्श जीवनाचे आजच्या युगात महत्त्व-प्रा.सुनील सोळंके



**माजलगाव । प्रतिनिधी**

आजच्या आत्यंतिक स्पर्धेच्या आणि ताणतणावाने ग्रासलेल्या युगात भगवान महावीर स्वामी यांचे आदर्श जीवन आणि त्यांच्या चरित्रातून घेतलेले मूल्य विश्वामानवतेसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत, असे प्रतिपादन प्रा.सुनील सोळंके यांनी भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात केले. भगवान महावीर स्वामी यांनी केलेल्या कठोर तपस्येचा आणि साधनेचा उल्लेख करताना प्रा.सोळंके म्हणाले की, ''महावीर स्वामी यांनी तब्बल चाळीस वर्षे कठोर तप करून कैवल्यज्ञान प्राप्त केले. त्यातूनच त्यांना आत्मविजयाची प्रचंड सिद्धी प्राप्त झाली. त्यांनी मनावर विजय मिळवण्यासाठी जे मार्ग सांगितले आहेत, ते आजच्या काळात अधिकच उपयुक्त ठरतात.'' यावेळी सकल जैन संघ माजलगाव, डॉ.क.अ.लोढा

## महावीर स्वामी जन्म कल्याणक निमित्त माजलगावात महाआरोग्य व रक्तदान शिबिर

प्रतिष्ठान माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी डॉ. यशवंत राजेभोसले, डॉ.अर्चना पवार, डॉ.सत्येंद्र दबडगावकर, डॉ.प्रताप लेंडाळ, डॉ.पुनम परतुरकर व अन्य वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ व वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आणि सेवाभावी वृत्तीने अनेकांनी सहभाग घेतला. शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत मोफत आरोग्य तपासणी, डोळे तपासणी, दात तपासणी इत्यादी सेवा पुरविण्यात आल्या. तसेच, रक्तदान शिबिरात अनेक युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत रक्तदान केले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर्स व समाजाचे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून भगवान महावीर यांच्या करुणा, अहिंसा व सेवाभाव या तत्त्वांचे महत्त्व अधोरेखित केले. महावीर जन्मकल्याणकाचे औचित्य साधून राबवण्यात आलेला हा सामाजिक उपक्रम आरोग्य जागरूकता आणि मानवसेवेचे उत्तम उदाहरण ठरला. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्वयंसेवक, डॉक्टर व आयोजकांचे शहरवासीयांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# अकोल्यात लागलेल्या आगीत शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे जिल्हा प्रशासनाला आदेश



**जालना । प्रतिनिधी**

**अकोला (ता. बदनापूर) गावातील मठवाडी परिसरात आज दुपारी अचानक लागलेल्या आगीत नुकसान झालेल्या धान्य पिकांचे तसेच जखमी पशूंचे तातडीने पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी असे आदेश राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिले आहेत. या घटनेची संपूर्ण माहिती जाणून घेत पालकमंत्र्यांनी या घटनेविषयी हळहळ व्यक्त केली आहे.**

अकोला गावातील गट क्रमांक ४१ मधील मठवाडी परिसरात आज दुपारी पोलवरील विजेच्या तारांचे घर्षण होऊन अचानक आग लागली. या आगीमुळे शेतातील गहू, हरभरा, तूर या धान्याचे तसेच चारा, गाडी बैल, पशू खाद्य, मोटर पाईपलाईन याचे मोठे नुकसान झाले. शेतात असलेली काही जनावरे देखील आगीत होरपळली. आग लागल्याचे कळताच तातडीने अग्निशमन दलाच्या गाड्या आल्या आणि आग आटोक्यात आणण्यात यश आले.

पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, बदनापूरच्या तहसीलदार आश्विनी डमरे यांच्याकडून आगीच्या घटनेची माहिती जाणून घेतली आणि झळ पोहोचलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे दिले आहेत. आगीत होरपळलेल्या जखमी पशूंवर तातडीने उपचार करण्यासही त्यांनी सांगितले आहे. दरम्यान, या घटनेबाबत आणि शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

# मुख्याधिकारी शांताराम गोसावी यांची सहायक आयुक्त पदी पदोन्नती

**जालना । प्रतिनिधी**



**घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी नगरपंचायत चे मुख्य अधिकारी म्हणून सेवा बजावणारे श्री शांताराम गोसावी यांची मुंबई (कोकण २) येथे सहआयुक्त पदी म्हणून पदोन्नती शासनाकडून देण्यात आली आहे. मुख्याधिकारी श्री शांती राम गोसावी यांनी शासनाची प्रशासकीय कामकाज राहता जिअहमदनगर, नंदुरबार जिल्हा प्रशासनाधिकारी , धुळे महानगर पालिका सह आयुक्त आणि कोपरगाव नगरपरिषद, कोपरगाव या ठिकाणी सेवा झालेली आहे, यानंतर तीर्थपुरी नगरपंचायत मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते आता त्यांची पदोन्नती शासनाकडून करण्यात आली आहे.**

सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार प्रियांका कुलकर्णी-छापवाले शासनाच्या उप सचिव यांनी आदेश काढले आहे. पदोन्नती झाल्यामुळे नगरपालिका नगरपंचायत च्या सर्व मुख्याधिकारी व अधिकारी कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# कीर्तन, प्रवचनामुळे समाज संस्कारक्षम व निरोगी राहण्यास मदत होते- ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे

**बीड । प्रतिनिधी**

**संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांकडे लक्ष दिले पाहिजे. किर्तन, प्रवचन आणि धार्मिक कार्यक्रमामुळे लहान मुलांवर संस्कार होतात. त्यामुळे पालकांनी धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्कारक्षम तरुण पिढी घडविण्यासाठी व समाजमन निरोगी राहण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहन ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांनी केले. बीड शहरातील पांगरी रोड भागात राधाकृष्ण नगरी येथे आयोजीत हनुमान जन्मोत्सव अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे बोलत होते.**

'ऐसी जोडी करा राम कंठी धरा। तेणे चुके फेरा गर्भवास।।१।। नाशिवंत आटी प्रिया पुत्र धन।बीज ज्याचे क्षीण तेची फळ।।२।। जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर बोलतांना ह.भ.प.खरमाटे महाराज यांनी सुश्राव्य कीर्तन केले. याप्रसंगी बोलताना खरमाटे महाराज म्हणाले, जीवनामध्ये पुढे जायचे असेल, जीवन यशस्वी व्हायचे असेल तर कष्ट घ्यावे लागतात. त्याचप्रमाणे परमेश्वरांच्या प्राप्तीसाठी अखंड नामस्मरण करावे लागते. बंकट स्वामी, नगदनारायण महाराज, भगवानबाबा, वामनभाऊ यांच्या नंतर आपण जन्माला आलो. आपण भग्यवान आहोत.



संतांचे संस्कार आणि शिकवणुकीमुळे नामचिंतन आणि परमार्थासाठी जीवन व्यथीत करु शकतो. देवत्वाकडे पोहचविण्यासाठी कर्म, भक्ती आणि ज्ञानाचा उपयोग होतो, असे सांगून कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून परमेश्वर प्राप्तीचा मार्ग सापडतो, असे खरमाटे महाराज म्हणाले. यावेळी मृद्गंगाचार्य ह.भ.प. चंद्रकांत महाराज शेळके, गायनाचार्य ह.भ.प.बाबुराव महाराज मुंडे, गणेश म.पिंपळे, मनोज म. बोठे, दत्तात्रय म.बहीर, यांच्यासह गणेश खाडे, आप्पासाहेब येवले, महेंद्र ढगे, मधुकर बाल्टे, दिपक बिल्पे, मुकेश शेवगण, सचिदानंद देशमुख, नरेश कुलकर्णी, रविंद्र बजगुडे, उमाकांत भोंडवे, सागर गणगे, राधाकृष्ण पुरी, प्रदिप राठोड, सुधाकर सानप, रामहरी घुले, महादेव घोळवे, नागरे नाना, धनराज शिंदे, आदिंसह भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.




बीडः जैन धर्माचे चोवीसावे तीर्थकर भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त बीड शहरात भव्य शोभा यात्रे आयोजन करण्यात आले होते. सुभाष रोड येथील अहिंसा चौक या ठिकाणी सर्वांनी भगवान महावीर यांना वंदन करून शोभायात्रा प्रारंभ झाली. यावेळी माजी आमदार सुरेश नवले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, आयोजक अशोक लोढा, ललित अब्बड, अमित पगारिया, सुशील पिंगळे, संदीप उबाळे, सतीशसिह परदेशीं, दिलीप पवारसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुरेश जाधव यांनी गुन्हेगारांचा बीड जिल्हा ही ओळख पुसण्याचा प्रयत्न केला-उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र टीव्ही जार्नालिझमची मातृसंस्था असलेल्या टिव्ही जार्नालिझम असोसिएशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट ग्रामीण पत्रकार प्रथम पुरस्कार बीडचे भूमीपुत्र सुरेश महाराज जाधव (न्यूज १८ लोकमत बीड जिल्हा प्रतिनिधी) यांना मिळाला. त्याबद्दल शिवसेना



उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जाधव यांचा सत्कार केला.

पत्रकार सुरेश जाधव यांनी बीड च्या पत्रकरिता क्षेत्रात मनाचा तुरा रोवला असुन, गुन्हेगारांचा बीड जिल्हा ही ओळख पुसण्याचा प्रयत्न सुरेश जाधव यांनी केला असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. यावेळीजिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हा प्रमुख राजु भाऊ माहुवाले, संदीप उबाळे, सतीशसिह परदेशी यांनी ही पत्रकार जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून...

### सरकारचे १०० दिवस

पण विधानसभा निवडणुकीत त्यांनी वेगळा घरोबा केला. विधानसभेत त्यांना आमदारकी टिकवता आली नाही. तरीही प्रहार संघटनेच्या माध्यमातून ते अनेकदा भूमिका घेताना दिसतात. सध्या त्यांनी कर्जमाफीसाठी एल्गार पुकारला आहे. त्यांच्या या आंदोलनाची राज्यभरात चर्चा होत आहे.

---------

### राज्यातील धरणांत ४२ टक्के

पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेतला तेव्हा राज्यातल्या चौदा जिल्ह्यातील १७८ गावे व ६०६ वाड्यांना टँकरने पाणी पुरवठा होत असल्याची आकडेवारी पुढे आली आहे. या गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवण्यासाठी खासगी २०७ आणि १६ शासकीय टँकर धावत असल्याची माहिती पुढे आली आहे.

-------------

### खून, खंडणीशी संबंध नाही ;

संतोष देशमुख यांची बंधू धनंजय देशमुख देखील न्यायालयात युक्तिवाद ऐकण्यासाठी आले होते. वाल्मिक कराडच्या दोषमुक्तीच्या अर्जावर धनंजय देशमुख यांनी संताप व्यक्त केला. ''गुन्हा केला त्याचा आरोपींना कोणताही पश्चाताप दिसत नाही. त्यांच्या चेहऱ्यावरती थोडीही भीती दिसत नाही. यावरून स्पष्ट दिसत आहे की जेलमध्ये त्यांना कशी वागणूक मिळते'', असा आरोप करीत आरोपींना जेलमध्ये व्हीआयपी ट्रिटमेंट मिळत असल्याची शंका धनंजय देशमुख यांनी अप्रत्यक्षरित्या व्यक्त केली.

----------

### २६/११ चा आरोपी तहव्वुर राणाला

कमांडो आधीच तैनात करण्यात आले होते. एनआयए मुख्यालयात एक चौकशी कक्ष तयार करण्यात आला आहे. एनआयएचे डीजी सदानंद दाते, आयजी आशिष बत्रा आणि डीआयजी जया रॉय यांच्यासह फक्त १२ सदस्यांना प्रवेश देण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. राणाला अमेरिकेत अटक झाली होती. यानंतर तब्बल १६ वर्षांनी अमेरिकेतून त्याचे प्रत्यार्पण करण्यात आले. तहव्वुर राणाला दिल्लीतील तिहार तुरुंगातील उच्च सुरक्षा वॉर्डमध्ये ठेवण्यात येईल. तुरुंग प्रशासनाने विशेष सुरक्षा व्यवस्था केली आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवाद्यांनी मुंबईतील १२ ठिकाणी एकाचवेळी हल्ला केला होता. यामध्ये १६६ नागरिक ठार झाले होती. दहशतवादी अजमल कसाब याला जिवंत पकडण्यात मुंबई पोलिसांना यश आले होते.

--------------

### वक्फ दुरुस्ती कायद्या विरोधातील

हे याचिकांवर सुनावणी करणाऱ्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग आहेत. एआयएमआयएमचे खासदार असदुद्दिन ओवैसी यांच्या याचिकेव्यतिरिक्त, न्यायालयाने आप नेते अमानतुल्ला खान, असोसिएशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स, अर्शद मदनी, समस्थ केरळ जमियातुल उलेमा, अंजुम कादारी, तैय्यब खान सलमानी, मोहम्मद शफी, मोहम्मद फजलुररहीम आणि राजद नेते मनोज कुमार झा यांनी दाखल केलेल्या याचिका सुनावणीसाठी सूचीबद्ध केल्या आहेत. दरम्यान, मंगळवारी (८ एप्रिल ) केंद्र सरकारने याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. वक्फ दुरुस्ती कायद्यावरील याचिकांवर काही आदेश देण्यापूर्वी न्यायालयाने सुनावणी घ्यावी, अशी विनंती केंद्राने न्यायालयाकडे कॅव्हेटमध्ये केली आहे. याच दिवशी देशभरात वक्फ दुरुस्ती कायदा लागू झाल्याची अधिसूचना केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाने जारी केली आहे. या अगोदर ५ एप्रिल रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली. त्यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केले गेले.

------------

### वडवणीत उपनगराध्यक्षासह नगरसेवक,

याठिकाणी मंगळवारर सायंकाळच्या सुमारास चौकात सुशोभीकरण करताना अडथळा निर्माण केला व हॉस्पिटलचा लावलेला फलक का काढला या कारणामुळे दोन गट आमने-सामने आले आणि बाचाबाची झाली. यावेळी दोन गटात तुफान हाणामारी झाली. या प्रकरणी शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रात्री उशीरा दोन्ही गटाने परस्पर गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये नगरसेवक प्रेमदास राठोड यांच्या फिर्यादीवरुन न.प. उपनगरध्यक्ष बन्शी केशव मुंडे, नगरसेवक सचिन शिवराम सानप, यांच्यासह बाळु बन्शी मुंडे, इंद्रमोहन केशव मुंडे, अनिल शिवराम सानप, वैभव सोळुंखे, धनराज श्रीमंत मुंडे, रंजित इंद्रमोहन मुंडे यांचा समावेश असून हे एकाच कुंटुबातील आहेत. तर सतिष इंद्रमोहन मुंडे यांच्या फिर्यादीवरून माजी नगरसेवक प्रेमदास सिताराम राठोड, सिताराम मानसिंग राठोड, आबासाहेब सीताराम राठोड, राहुल देवीदास राठोड, सुमित प्रेमदास राठोड, रवि प्रेमदास राठोड, राजुदास सिताराम राठोड अशा १८ जणांवर मारामारीचे गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणी वडवणी पोलीस तपास करत आहेत.

------------

### 'फुले' चित्रपटाच्या आक्षेपावरून, सेन्सॉर

प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील आपल्या सोशल मीडियावरील प्रतिक्रियेत म्हणाले की, काश्मीर फाईल्स, केरला फाईल्स सारख्या फिल्म्सवर सेन्सॉर बोर्ड कोणताही आक्षेप घेत नाही. मात्र 'फुले' सारख्या चित्रपटावर आक्षेप घेतला जात आहे असे ते म्हणाले. नामदेव ढसाळ कोण आहेत, असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या सेन्सॉर बोर्डात किती विद्वान लोक बसतात याची कल्पना आली होती. पण आता फुले चित्रपटावर आक्षेप घेतले जात आहे त्यातून सेन्सॉर बोर्डाची मानसिकता लक्षात येते अशी टीकाही त्यांनी सेन्सॉर बोर्डावर केली आहे.

-----------

### बँकांमध्ये मराठीचा वापर न

पक्षाचा पवित्रा पुन्हा मांडला होता. जाणीवपूर्वक मराठी न बोलणाऱ्यांना थोबाडीत मारू, असा इशाराही त्यांनी दिला होता.

-------------

मुख्य आरोपी निघाला पोलिस

करण्याचे प्रशिक्षण दिले. यानंतर काही महिन्यांपूर्वीच केंद्रेने आपल्या गावाकडे माळरानावर शेड बांधले आणि त्यात ड्रग्जचे उत्पादन सुरू केले. तो मुंबईतून कच्चा माल आणायचा आणि आपल्या साथीदारांच्या मदतीने शेतात ड्रग्स तयार करायचा.

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५



## आजोबाच्या पुण्यतिथीनिमित्त जि.प.शाळेस संगणक भेट

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

आपल्या गोमळवाडा गावचे भूमिपुत्र श्री अरुण पवार साहेब (आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी ,यावल जि. जळगाव) या ठिकाणी कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्या आजोबाच्या पुण्यतिथीनिमित्त आपल्या गावच्या जिल्हा परिषद केंद्रीय शाळेसाठी शैक्षणिक कामासाठी वस्तू देण्याचे जाहीर केले होते त्यानुसार त्यांनी आज आपल्या केंद्रीय शाळेसाठी एक उच्चतम प्रतीचा संगणक, आणि स्कॅनर ,झेरॉक्स व कलर प्रिंटर एकत्र मिळून ३ १ अशा पद्धतीचे मशीन जवळपास एक लाख रुपये किमतीचे मशीन व इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचा सेमी इंग्लिश चा डाउनलोड अभ्यासक्रम प्रत्यक्षात आज समस्त गावकरी, पालक ,शिक्षणप्रेमी यांच्या उपस्थितीत दिले त्याबद्दल सर्वांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. साहेबांचे वडील सुद्धा कार्यक्रमात उपस्थित होते. सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात मा .सरपंच सुदाम काकडे, जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक श्री अभिमन्यू कातखडे सर, श्री दिपक पाटील सर यांनी सत्कार समारंभात आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष भाषणामध्ये श्री पवार साहेबांनी यापुढील काळात जिल्हा परिषद शाळेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. श्री अण्णासाहेब ढाकणे सर यांनी आभार प्रदर्शन केले

# शिक्षक समन्वय संघाचा १४ एप्रिलपासून शिक्षकांच्या मागण्यांसाठी हुंकार

## प्रचंड संख्येने सहभागी होऊन आयुक्तांच्या दारात करणार हुंकार

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील खाजगी प्राथमिक,माध्यमिक,उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६५ हजार विना तथा अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १४ ऑक्टोबर २०२४ मधील वेतन अनुदान वितरणाचे आदेश १ जून २०२४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करणयासठीचे टप्पा वाढ वेतन आदेश वाटप करणे या प्रमुख मागणीसाठी शिक्षक समन्वय संघावतीने पुणे आयुक्त कार्यालय येथे १४ एप्रिल २०२५ पासून हुंकार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील कायम शब्द काढलेल्या प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यावर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पंधरा ते वीस वर्षां पासून काही विनावेतन तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान





शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार,आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस-वीस वर्षे झाली तरी विनावेतन राबवून घ्यायचे.एव्हढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही,या वेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्या १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करण्यात आले तेव्हा कुठे १० ऑक्टोबर २०२४ रोजी शिक्षक समन्वय संघाच्या मागणीचा साकल्याने विचार करत मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय करत १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे. परंतू शासननिर्णय निर्गमित होऊन आज आठ ते दहा महिने झाले तरी सदरील शासननिर्णयाचे आयुक्त स्तरावरून अनुपालन होतांना दिसत नाही.या शासननिर्णयाचे आयुक्त स्तरावरून अनुपालन व्हावे यासाठी शासनस्तरावरून २६ नोव्हेंबर २०२४ रोजी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.असे आदेश असतानाही अनुपालन न करणे म्हणजे शासनाने घेतलेल्या शाळा,शिक्षण आणि शिक्षक हिताच्या दृष्टीने अत्यंत निंदनीय बाब आहे. १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासननिर्णयाचे अनुपालन करत तात्काळ टप्पा वाढ आदेश वितरित करण्याचे आदेश निर्गमित करणे याच मागणीसाठी शिक्षक बेमुदत हुंकार आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता मा.आयुक्त महोदयांनी शाळा,शिक्षण आणि शिक्षक यांच्या मागण्याची तात्काळ दखल यथोचित न्याय देत आदेश दिले पाहिजे अशी भावना राज्यभरातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने शिक्षक समन्वय संघाने निवेदनाद्वारे राज्याचे शिस्तप्रिय शिक्षण आयुक्त महोदय यांना केली आहे.अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथील आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी झाले पाहिजे.जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत शिक्षक समन्वय संघ मागे हटणार नाही असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने प्रा.राहुल कांबळे,के.पी.पाटील,सौ.नेहाताई गवळी,प्रा.संतोष वाघ,प्रा.दिपक कुलकर्णी, यांसह हजारो शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार आहेत.

अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक,उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हिताचा निर्णय तात्कालिन सरकारने घेतला असतांना त्याच शासननिर्णयाचे अनुपालन करण्याची जबाबदारी मा.आयुक्त महोदय यांची असतांना ते जबाबदारीपासून पळ काढत आहे.त्यांनी पुढाकार घेत न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

के.पी.पाटील, समन्वयक,शिक्षक समन्वय संघ

शासनाच्या वतीने अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षकांना न्याय देण्यासाठी निर्णय होऊन आज ९ महिने उलटले तरी त्याचे अनुपालन होतांना दिसत नाही.सदरील शासननिर्णयाचे अनुपालन करणे व असे अनुपालन करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही.

प्रा.राहुल कांबळे, समन्वयक,शिक्षक समन्वय संघ,महाराष्ट्र राज्य

सरकारने नुकतीच लोकप्रिय लाडकी बहिण योजना आणली आहे.राज्यशासनाच्याच मान्यतेने सुरू असलेल्या अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षिका मात्र गेल्या पंधरा वर्षांझाली वेतनापासून वंचित आहेत.या शिक्षिका सरकारच्या लाडक्या बहिणी नाहीत का?

सौ.नेहाताई गवळी, समन्वयक,शिक्षक समन्वय संघ, महाराष्ट्र राज्य

# संत महंतांच्या उपस्थितीमध्ये पिंपळनेरमध्ये प्रारंभ झाला श्री क्षेत्र भगवानगडाचा ९१ वा नारळी सप्ताह

### सप्ताहातील ज्ञानाने आपले जीवन उत्क्रांत करण्याचे महंत नामदेव महाराज शास्त्रीजींनी केले आवाहन

**शिरूर । प्रतिनिधी**

श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९१ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे पिंपळनेर (ता.शिरूर, जि.बीड) ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली आज सप्ताहाचा फुले टाकून प्रारंभ करण्यात आला. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९१ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेऊन बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात.

१० ते १७ एप्रिल हा या महोत्सवाचा कालावधी असून सप्ताहामध्ये




दररोज ठीक ३:३० ते ६ या वेळेमध्ये ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज साठे यांची श्रीमद्? भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी भगवानगड), ह.भ.प. प्रभाकर महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प.सोपान महाराज शास्त्री(भागवताचार्य), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर (समाज प्रबोधनकार) ,ह.भ.प.अमृत महाराज जोशी (महामंडलेश्वर), ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांवकर) यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये परंपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रमही होतील.

### महंत नामदेव महाराज शास्त्रीजींनी सांगितल्या मार्गदर्शक सूचना व नियमावली

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प. श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी सप्ताहाचे फुले टाकताना उपस्थित संत, महंत, टाळकरी, गावकरी व भाविकांना पूर्ण सप्ताहामध्ये अध्यात्मिक ज्ञान व दररोज ग्रामस्थांतर्फे मिळणाऱ्या मिष्टान्न भोजनाचा शिस्त व शांततेत आस्वाद घेण्याचे आवाहन केले. तसेच सप्ताहातील सर्व अध्यात्मिक कार्यक्रमांचे श्रवण करून आपले जीवन उत्क्रांत करण्याचा प्रयत्न करावा असे आवाहनही यावेळी श्रीगुरु शास्त्रीजींनी केले.

## जयवंती नदी पात्रातील अतिक्रमणे काढावी या मागणीसाठी अभिजीत लोमटे यांचे २१ एप्रिल पासून उपोषण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील जयवंती नदी पात्रातील अतिक्रमणे काढावीत अशी मागणी डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई चे अध्यक्ष तथा संग्राम महाराष्ट्राचा न्यूजचे संपादक अभिजीत लोमटे यांनी माननीय महसूल आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे ई-मेल निवेदणाद्वारे केली आहे.



अंबाजोगाई शहर हद्दीतील जयवंती नदी ही ऐतिहासिक व पौराणिक असून पुरातन काळापासून अंबाजोगाई शहरवासी यांचे धार्मिक कार्यक्रम या नदीकाठावर पूर्वपारपासून होत होते अंबाजोगाई शहराचे नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या जयवंती नदी ही शहरातील काही समाजकंटक यांनी पूर्णपणे गिळंकृत करून कागदपत्राची हेराफेरी करत नदीस नाला घोषित केला आहे नदी पात्रात अनेक अनधिकृत बांधकाम करून धन दांडग्यांनी संगमत करून स्वतः देखील अनधिकृत कब्जा करून नदी गिळणकृत केली आहे वास्तविक पाहता महसूल व शासनाकडे संपूर्ण रेकॉर्ड असताना देखील राजकीय दबावामुळे सदरच्या अतिक्रमाला विरोध केला जात नाही या उलट स्थानिक महसुली अधिकारी शांत बसून एक प्रकारे अतिक्रमाला खतपाणी देत आहेत तहसीलदार अंबाजोगाई यांनी सदरची अतिक्रमणे त्वरित दूर करावीत.

शिवाय राजकीय पाठबळाच्या जोरावर नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी नियमबाह्य पणे नदी पात्रात बांधकाम केलेल्या नियमबाह्य कामाची प्रशासनाने सदरच्या कामाची चौकशी करावी तसेच जयवंती नदीचे दस्तावेज अनधिकृतपणे फेरबदल करत जयवंती नदी चा नाला करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी महसूल आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई चे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी केली असून जयवंती नदीपात्रातील अतिक्रमण न काढल्यास २१ एप्रिल पासून उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.

## माहेश्वरी समाजाच्या वतीने अंबाजोगाई बसस्थानकात पाणपोई

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई बस स्थानक येथे माहेश्वरी समाजाच्या वतीने पाणपोई सुरू करण्यात आली आहे. या पाणपोईचे उद्घाटन अंबाजोगाई आगार प्रमुख श्री अमर राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बस स्थानक अंबाजोगाई हरिदास गिरी, बीड जिल्हा माहेश्वरी अध्यक्ष श्रीकृष्ण तोष्णीवाल, बीड जिल्हा माहेश्वरी युवा अध्यक्ष रोहन मुंदडा, सचिव नितेश लोहिया, तालुकाध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, तालुका महिला अध्यक्षा सौ. शिवकन्या रांदड, युवा अध्यक्ष किरण भन्साळी उपस्थित होते.



यावाबत सविस्तर असे की, माहेश्वरी समाजाच्या वतीने मागील बारा वर्षांपासून सातत्याने बसस्थानक अंबाजोगाई येथे उन्हाळी पाणपोई च्या माध्यमातून प्रवाशांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. याही वर्षी येथील बसस्थानकात पाणपोई सुरू करण्यात आली आहे. उदघाटन कार्यक्रमाची सुरवात महेश पूजनाणे झाली. या उद्घाटन समारंभास संजय लोहिया, पुरुषोत्तम चोकडा, रामानुज मुंदडा, राधेश्याम लोहिया, स्वप्नील बाहेती, पुरुषोत्तम रांदड, संपत सारडा, सुशील रांदड, प्रीतम तापडिया, जयप्रकाश भूतडा, ललित बजाज, प्रवीण बजाज, संजय लोहिया, मनोज बांगड, गोविंद तापडे, राजू दरक, अमित रांदड, गोपाल लोहिया, सौ.कांता मुंदडा, रेणू झंवर, सौ.उमा बजाज व समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन जगदीश जाजू यांनी तर आभार विजय नावंदर यांनी मानले.

# न्यायालयाचा जय महेश कारखान्याला दिलासा; अतिक्रमण धारकांना चपराक

**माजलगांव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पवारवाडी येथील एन एस एल शुगर्स लि. युनिट ३ जय महेश यांची शिवार मौजे खरात आडगांव येथे गट नं.८६ मध्ये माजलगांव परभणी रस्त्यालगत ०२ हेक्टर ८० आर मिळकत आहे. सदर मिळकतीवर मालकी व ताबा नसताना केवळ ७/१२ उताऱ्याला नाव असल्याचा गैरफायदा घेवुन मुळ मालक अच्युत हरिभाऊ शेजुळ व बालासाहेब अच्युत शेजुळ यांनी सदर जमीन तुकडेबंदी कायद्?याचे उलंघन करून, एन ए ले आऊट न करता व



कुठलीही परवानगी न घेता सदर जमीन एकुण २० लोकांना तुकड्यामध्ये विकली.सदर लोकांनी कारखान्याच्या जमीनीवर अतिक्रमन केल्याचे लक्षात आल्यानंतर कारखान्याने ॲड.



दिपक देशमुख यांच्या मार्फत दिवाणी न्यायालय माजलगांव या ठिकाणी दावा नं. २६/२०२३ एन एस एल शुगर्स विरुध्द अच्युत शेजुळ व इतर असे अतिक्रमण हटवुन ताबा मिळणे बाबतचा दावा दाखल केला.सदर दाव्यामध्ये दोन्ही बाजूंचा युक्तिवाद न्यायालयाने ऐकला.सदर प्रकरणामध्ये मनाई हुकुमाचा आदेश पारीत करीत असतांना न्यायालयाने प्रथमदर्शनी सदर मिळकतीचे मालक हे एन एस एल शुगर जय महेश कारखाना असल्याचे दिसुन येते,असा महत्वपुर्ण निष्कर्ष नोंदवलेला आहे. तसेच सदर दाव्याचा अंतिम निकाल लोगपर्यंत दाव्यातील प्रतिवादी अच्युत हरिभाऊ शेजुळ, बालासाहेब अच्युतराव शेजुळ, भगिरथ माणिक शेजुळ,बळीराम रतन आढाव, रामेश्वर मधुकर शेजुळ,पुरुषोत्तम भारत यमगर, बाबासाहेब भारत यमगर,रमेश बाबुराव पांचाळ, चंद्रकुमार हरिभाऊ शिंदे,रमा महेश महामुनी,उत्तम ज्ञानोबा बागडे, रामचंद्र बाबुराव सोमक,अशोक रामभाऊ जाधव, संदिपान भागुजीराव लेंडाळ, सुलोचना महेंद्र गायकवाड, तुळशीदास शंभुदेव पांचाळ,राजाभाऊ उत्तम रासवे,मिरा देवानंद निसर्गध, बंडु शेषेराव यमगर, बाबुराव ज्योतीराम पतंगे,तुकाराम ज्योतीराम पतंगे यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत मिळकत कोणासही विक्री, गहाण अथवा कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करु नये असा प्रतिवादींच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम वादीचे हक्कात मंजुर केलेला आहे.या प्रकरणात जय महेश कारखान्याच्या वतीने ॲड. दिपक देशमुख यांचा युक्तिवाद प्रभावी ठरला. ॲड. दिपक देशमुख यांना या प्रकरणी ॲड. प्रसाद कुलकर्णी, ॲड.दिपक बजाज, ॲड. पवन पांचाळ व ॲड. निवास मखमले व कारखान्याचे डेप्युटी लिगल मॅनेजर रुद्रजीत अधिकारी यांनी सहकार्य केले.

पान ६ वरून...

### दत्त संस्थान बालाघाट येथे

होणार आहे. या जन्मोत्सव सोहळ्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच मासिक पौर्णिमेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेली आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांना नम्र विनंती आहे की या चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सवला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) व महादेव अण्णा शेलार रा.शिवाजीनगर (उदंडवडगाव) यांनी केले आहे.

### राजकिशोर मोदी यांच्याकडून जगाला

आपल्या स्वतःविषयी असणारा भाव अन्य प्राण्यांविषयी देखील असू द्यावा. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा. मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो असे भगवान श्री महावीर म्हणत असत. स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पाहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणाऱ्याकडून कळत नकळत हिंसा करतो असे भगवान श्री महावीर यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट देणे किंवा ईजा पोचवणे टाळावे अशी शिकवण भगवान श्री महावीर आपल्या प्रत्येक प्रवचनातून देत असत असेही मत राजकिशोर मोदी यांनी यावेळी मांडले.

### बीड जिल्हा शाश्वत विकास

होऊन बीड मधील पत्रकारांनी यासाठी पुढाकार घेतला असल्याचेही ते म्हणाले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार आणि अप्रतिम मीडियाचे संचालक डॉ. अनिल फळे यांनी शाश्वत विकास म्हणजे काय आणि तो कशा पद्धतीने राबविला जातो. त्यासाठी काय करायला हवे, यात शासनाची जबाबदारी काय असते आणि लोकसहभाग कसा वाढवायचा याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. डॉक्टर दीपाताई क्षीरसागर यांनी शाश्वत विकास जिल्ह्यात रुजवायचा असेल तर ग्रामीण भाग महत्त्वाचा असून, त्यात तरुणांचा सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. जिल्ह्यामध्ये अशा चांगल्या कामांची गरज असून, अलीकडे बीडची जी बदनामी होत चालली आहे, त्याला रोखण्यासाठी पत्रकार महत्त्वाची भूमिका बजावू शकतात आणि जिल्ह्यात शाश्वत विकासाची प्रक्रिया राबविली गेली तर आपोआपच विकास होईल आणि बदनामी बंद होईल असे त्या म्हणाल्या. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी आपापल्या सूचना मांडत स्वतःचे अनुभव कथन केले. तळागाळात जाऊन काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मनीषाताई तोकले यांनी जिल्ह्याची विदारक परिस्थिती सांगितली.यावेळी उपस्थित असलेल्या शासकीय अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी शासकीय योजना सोबतच सामाजिक संस्था आणि सामाजिक कार्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकीय व सर्व क्षेत्रातील सामाजिक संस्थांचा आणि मुख्य म्हणजे शासकीय, निम शासकीय अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याची गरज व्यक्त करण्यात आली. याबाबत पुढील बैठक लवकरच घेण्यात येणार असून, त्यामध्ये शाश्वत विकासाच्या फोरमनुसार वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्यांची कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. सदरील बैठकीला, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानचे तत्वशील कांबळे, प्रवीण प्रशिक्षक गौतम वाघमारे, प्रवीण प्रशिक्षक ए बी गुंजकर, यशदाचे मास्टर ट्रेनर भास्कर पिंपरीकर, ए आय एम ट्रस्टचे ओम प्रकाश गिरी, पसायदान सेवा प्रकल्पाचे गोवर्धन दराडे, विहान प्रकल्प बीडचे डॉक्टर राजन दहिवाळ, उद्योजक गोविंद कासट, व्यावसायिक अन सामाजिक कार्यकर्ते गणेश देशमुख, सामाजिक कार्यकर्ते अशोक खरसाडे, सामाजिक कार्यकर्त्या मनीषाताई तोकले, पर्यावरण कार्यकर्ता मोहन परजणे, सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट विलास जोशी, उपप्राचार्य डॉक्टर संजय पाटील देवळाणकर, संपादक बिलाल शेख, पत्रकार सुभाष चौरे, पत्रकार देविदास पवार, पत्रकार साजेद शेख, पत्रकार रवी उबाळे, पत्रकार अनिल अष्टपुत्रे, पत्रकार मुकुंद पाटील यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि संपादक, पत्रकार यांची उपस्थिती होती.

### प्रा.रंगनाथ तिवारी यांना

यांच्या नावाने मिळतो आहे. याचे मला समाधान वाटते आहे. मी महाराष्ट्र साहित्यि परिषदेचे ऋण मानतो असे प्रा.रंगनाथ तिवारी यांनी मनोगतात म्हटले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीनाथ तिवारी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.राम चौधरी यांनी मानले.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५
४

# बीटी कापसाच्या किंमतीतील वाढीवरुन राकेश टिकैत यांचे कृषिमंत्र्यांना पत्र

नवी दिल्ली : बीटी कापसाच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकैत यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना पत्र लिहिलं आहे. या पत्रात बीटी कापसाच्या वाढत्या किंमतीला आवर घालण्याची मागणीही टिकैत यांनी केली आहे.

टिकैत यांनी पत्रात बीटी कापसाच्या वाढत्या किमतीकडे लक्ष वेधलं आहे. ते म्हणाले, ''केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २८ मार्च २०२५ रोजी बोलगार्ड बीटी कापूस बियाण्यांच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत ३७ रुपयांची वाढ केली आहे. म्हणजेच ४.२ टक्के वाढ करण्यात आली आहे. खरीप हंगाम चार महिन्यांवर येऊन ठेपला आहे. त्यावेळी ही वाढ करण्यात आली आहे. परिणामी बीटी कापसाच्या व्यापाराशी संबंधित कंपन्यांना याचा फायदा होईल. बीटी कापसाच्या बियाण्यांच्या अपयशानंतरही केंद्र सरकारने बियाण्यांच्या किमती वाढवल्या आहेत,



ते निंदनीय पाऊल आहे.'' अशी टिकाही टिकैत यांनी यांनी केली आहे. पुढे टिकैत यांनी कापसाच्या घटत्या उत्पादनावर बोट ठेवलं. ते म्हणाले, ''केंद्र सरकारने कापसाच्या बियाण्यांच्या किमती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय चिंताजनक आहे. बीटी कापसामुळे शेतकऱ्यांचं उत्पादन कमी होत आहे. त्यातच देशाच्या विविध भागांमध्ये किड-रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. गुलाबी बोंड अळीने शेतकऱ्यांचं उत्पादन घटलं आहे.'' असा मुद्दाही टिकैत यांनी मांडला आहे. देशात बीटी कापसाकडून जीएम वाणांचा स्वीकार करण्याची मागणी केली जात आहे. परंतु यावर अलीकडे केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांनी चिंता व्यक्त केली आहे. बीटी कापूस ने बीटी कापूस चे निराकरण केलं नाही. तसेच जीएम कापसाच्या आणखी महागड्या तंत्रज्ञानाचा उदय होईल. परंतु तो पुन्हा अपयशी ठरेल. या आधीही घडलं आहे, पुढेही घडेल अशी चिंता चौहान यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, महाराष्ट्रात विदर्भ, खानदेश आणि मराठवाड्यात खरीप हंगामात कापूस प्रमुख पीक आहे. परंतु गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावाने शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे कापूस पिकात नवीन तंत्रज्ञानाची गरज जाणकार व्यक्त करत आहेत. तसेच सध्या कापसाची उत्पादकता घटली आहे. तर बाजारात मिळणारा भावही हमीभावाच्या खाली मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कापूस पिकातून उत्पन्नाची हमी राहिली नाही, असं शेतकरी सांगतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०६ : ग्रेट ब्रिटनने 'यूनियन जॅक'ला राष्ट्रीय ध्वज म्हणून मान्यता दिली.
१९६१ : रशियाचा युरी गागारिन हा अंतराळात भ्रमण करणारा पहिला मानव बनला. त्याने अंतराळात १०८ मिनिटे भ्रमण करुन पृथ्वीप्रदक्षिणा केली.
१९६१ : सोवियेत संघाचा युरी गागारिन अंतराळात जाणारा प्रथम माणूस झाला.
१९६७ : कैलाश नाथ वांछू यांनी भारताचे १० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७८ : भारतातील मुंबई ते पुणे शहरादरम्यान पहिली डबल डेक्कर रेल्वे धावली.
१९९७ : पूर्व प्राथमिक प्रवेशाकरता पाल्य अथवा पालकांच्या मुलाखती घेण्यास मनाई करण्याची तरतूद असणारे विधेयक विधानसभेत मंजूर
१९९७ : भारतीय पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचा राजीनामा.
१९९८ : गेल्या शतकातील साठच्या दशकात हरितक्रांती घडवून आणण्यात मोलाची कामगिरी बजावणारे सी. सुब्रम्हण्यम यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान
२००९ : झिम्बाब्वेने अधिकृतरीत्या झिम्बाब्वेचे डॉलर हे चलन सोडून दिले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५९९ : जैनांचे २४ वे तीर्थंकर महावीर यांचा जन्म.
१३८२ : मेवाडचा महापराक्रमी राजा संग्रामसिंग ऊर्फ राणा संग चैत्र व. ९
१८७१ : वासुदेव आपटे - आनंद या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक व संपादक.
१८८५ : महोजोदडोची शोध करणारे भारतीय पुरातत्व व संग्रहालय तज्ञ राखलदास बनर्जी यांचा जन्मदिन.
१९१० : पु.भा. भावे (पुरुषोत्तम भास्कर भावे) - मराठीतील प्रतिभासंपन्न लेखक.
१९१४ : कृष्ण गंगाधर दिक्षीत ऊर्फ कवी संजीव - 'सासरमाहेर', 'भाऊबीज', 'चाळ माझ्या पायांत' या चित्रपटांचे त्यांनी कथा, संवाद व गीतलेखन केले होते. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९९५)
१९१७ : विनू मांकड - सलामीचे फलंदाज व डावखुरे मंदगती गोलंदाज (मृत्यू: २१ ऑगस्ट १९७८)
१९३२ : लक्ष्मण कादिरमगार - श्रीलंकेचे परराष्ट्रमंत्री, मुत्सद्दी, वकील व तामिळ नेते (मृत्यू: १२ ऑगस्ट २००५)
१९३७ : साली भारतीय हिंदी चित्रपट क्षेत्रांतील सुप्रसिद्ध गीतकार व अभिनेते गुलशनकुमार मेहता यांचा जन्मदिन.
१९४३ : सुमित्रा महाजन - लोकसभा अध्यक्ष
१९५४ : सफदर हश्मी - मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (मृत्यू: २ जानेवारी १९८९)
१९८१ : तुलसी गॅब्बार्ड, अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहात निवड झालेली पहिली हिंदू व्यक्ती.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत सत्तेचे शासक सुलतान म्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१७२० : बाळाजी विश्वनाथ भट तथा पहिला पेशवा (जन्म: १ जानेवारी १६६२)
१८१७ : चार्ल्स मेसिअर - फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (जन्म: २६ जून १७३०)
१९०६ : महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र 'न्यायरत्न' भट्टाचार्य (जन्म: २२ फेब्रुवारी १८३६)
१९४५ : फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट - अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३० जानेवारी १८८२)
२००१ : भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनीज चे अध्यक्ष देवांग मेहता यांचे ऑस्ट्रेलियात निधन (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२००१ : पै. चंबा मुत्नाळ - हिंदकेसरी
२००१ : स्माईली चे जनक हार्वे बॉल यांचे निधन. (जन्म: १० जुलै १९२१)
२००६ : राजकुमार - कन्नड चित्रपट अभिनेता व गायक (जन्म: २४ एप्रिल १९२९).

# बंदिस्त वाफे तयार करणारे यंत्र वापरा ; कोरडवाहू जमीन पाणीदार बनवा



कोरडवाहू शेती ही नेहमी एकूण पडणाऱ्या पावसावर अवलंबून नसून ती पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी जमिनीत मुरणाऱ्या पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते, हे लक्षात ठेवले पाहिजे. पावसाचे पाणी वाचविण्याचा सर्वांत कार्यक्षम आणि स्वस्त मार्ग जमिनीत मूलस्थानी जलसंधारणद्वारे मुरवून पाणी ठेवणे. माती आणि जलसंधारणाच्या प्रभावी पद्धतींपैकी एक म्हणजे शेतात बंदिस्त वाफे तयार करणे. उताराला आडवे वाफे व उभे वाफे समांतर अंतराने जोडून बंदिस्त वाफे तयार करता येतात. हे वाफे तयार करण्यासाठी जास्त प्रमाणात मजुरांची गरज असते. हे काम जास्त कष्टाचे असल्यामुळे मजुरीमुळे खर्च वाढतो.अशा परिस्थितीत बंदिस्त वाफे जर यंत्राने केले तर कमी खर्चात जास्त चांगल्या प्रकारे हे काम होते. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीत कृषी अवजारे आणि यंत्रे संशोधन प्रकल्पामध्ये ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनविणारे अवजार विकसित केले आहे. या यंत्राने ६ मीटर लांबी व २ मीटर रुंदी असलेले बंदिस्त वाफे तयार करता येतात. वाफ्याच्या वरंब्याची उंची साधारणपणे २० ते २२ सेंटीमीचर राहते. यामुळे पडलेल्या पावसाचे पाणी मुरवणे किंवा वाहून जाणारे पाणी अडवणे शक्य होते.

यंत्राचे फायदे : जमिनीमध्ये ५० टक्के जास्त ओल साठवली जाते. पाण्याची आणि मातीची धूप रोखते, आर्द्रता वाचते आणि पिकाचे उत्पादन वाढते. या यंत्राच्या फार्मर्स फर्स्ट प्रकल्प, कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, राहुरी; कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, सोलापूर प्रक्षेत्रावर चाचण्या घेण्यात आल्या. या यंत्राची प्रक्षेत्रीय कार्यक्षमता खूप चांगली आहे. त्यात रब्बी ज्वारीसाठी जमिनीत परतीच्या पावसाचे पाणी मुरविण्यासाठी बंदिस्त वाफे तयार केल्यामुळे रब्बी ज्वारीचे उत्पादन २ ते ३ क्विंटल पर्यंत वाढल्याचे आढळले.

वैशिष्ट्ये : हे यंत्र ३५ अश्वशक्ती किंवा त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालवता येते. या यंत्राने एका दिवसात ४ ते ४.५ हेक्टर क्षेत्रावर बंदिस्त वाफे तयार करणे शक्य आहे. यंत्राच्या वापरामुळे पारंपरिक पद्धतीपेक्षा खर्चामध्ये ३० ते ४० टक्के बचत होते. पावसावर अवलंबून असणाऱ्या म्हणजेच कोरडवाहू पिकांसाठी हे यंत्र जास्त फायदेशीर ठरते. उदा. ज्वारी, बाजरी, मका, डाळी आणि तेल बियाणे, काही नगदी पिके उदा. कापूस, एरंडेल आणि भुईमूग इ. परिणामी पिकांचे उत्पादन वाढते.

# चांगला भाव मिळणारा 'गुलाबी लसूण'

अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या गुलाबी लसणाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे या लसणाचे भाव वाढत चालले आहेत.

हायब्रीड लसणापेक्षा गावरान लसणाला ग्राहक पसंती दर्शवित आहेत, परंतु हे मिळणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांनी या गुलाबी लसणाच्या लागवडीकडे एक अधिक उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून बघणे गरजेचे आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत एका एकरमधून जवळपास तीन क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. शहरी भागासह ग्रामीण भागातील भाजी मंडईमध्ये गुलाबी रंगाचा लसूण पहावयास मिळत नाही. मोठा व चांगल्या प्रतिचा लसूण मिळाला तरी त्याचा भाव ३५० रुपये असतो. हा लसूण काही मोजक्या शेतकऱ्यांकडेच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिक या लसणाला गावरान असे सुद्धा म्हणतात. दरम्यान, आठवडी बाजारपेठेत भाजीपाला नेहमीच मिळतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळ भाज्यांचे भाव कमी जास्त होत असतात; परंतु हायब्रीड ऐवजी गुलाबी रंगाच्या लसणाला नेहमीच मागणी असते. बीड जिल्ह्यात अत्यल्प प्रमाणात गुलाबी दिसणाऱ्या गावरान लसणाची लागवड केली जाते.

हवामान : या पिकास समशितोष्ण हवामान उपयुक्त असते. मात्र अति उष्ण व अति थंड हवामान या पिकास मानवत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात ७५ सेमीपेक्षा जास्त पाऊस पडत असल्यास पिकाची वाढ चांगली होत नाही. दिवसाचे २५ ते २८ अंश सेल्सिअस व रात्रीचे १० ते १५ अंश सेल्सिअस तापमानात गड्ढ्यांची चांगली वाढ होते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात केलेली लागवड अधिक उत्पादन देते. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते, परिणामी उत्पादनात घट होते.

जमीन : मध्यम खोलीच्या भरपूर सेंद्रिय खते घातलेल्या रेती मिश्रित कसदार तणविरहित जमिनीत पीक चांगल्या प्रकारे घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनी, चिकण मातीच्या जमिनी लागवडीस योग्य नसतात.

सुधारित जाती : महाराष्ट्रामध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, भीमा पर्पल या जाती असून या सर्वांचा रंग गुलाबी किंवा जांभळा असतो. गोदावरी वाणाचा स्वाद अगदी तिखट असून राहुरी विद्यापीठाने हे वाण विकसित केले आहे. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे.

आंतरपीक : लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्येसुद्धा लागवड करता येते.



# संत्रावर्गीय पिकावरील डिंक्या आणि इतर रोगांचा प्रकोप

अलीकडे संत्राबागांवर डिंक्या व इतर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने संत्रा उत्पादकांची चिंता वाढली आहे. डिंक्या हा रोग बुरशीजन्य असून, झाडाला कुठल्याही अवस्थेत होतो, परंतु नवीन लागवडीमध्ये याचा प्रादुर्भाव अधिकच हानिकारक ठरतो. शेतकर्यांनी या रोगाचे वेळीच योग्य व्यवस्थापन केल्यास आर्थिक नुकसान टाळता येईल. प्रतिकूल हवामानामुळे शेंडेमर, डिंक्याचा प्रादुर्भाव वाढत असल्याने संत्रा बागांना धोका निर्माण झाला आहे.

डिंक्या रोगाचा प्रादुर्भाव व लक्षणे : दुर्लक्षित संत्र्याच्या बागांत 'फायटोप्थोरा' बुरशीमुळे हा रोग आढळून येतो. डिंक गळणाऱ्या झाडावर विपरीत परिणाम होतो. या बुरशीमुळे साल व खोडामध्ये डिंक साठतो. डिंकाच्या दाबामुळे झाडाची साल उभी फाटते व डिंक ओघळू लागतो. कधी-कधी साल गळून पडते, पाने पिवळी पडतात व फांद्या सुकतात. रोगाची लागण फळांनाही होते. फळावर तेलकट नारिंगी डाग दिसून येतात व फळे गळून पडतात. झाडाच्या कुठल्याही अवस्थेत हा रोग होतो, परंतु नवीन लागवडीमध्ये डिंक्याचा प्रादुर्भाव अधिकच हानिकारक ठरतो. या रोगाचा प्रसार उष्ण तापमानात म्हणजे २७ ते ३० डिग्री सेल्सिअस असताना बुरशी मोठ्या प्रमाणात वाढते. दुर्लक्षित संत्रा बागात बुरशीमुळे होणार्या डिंक्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यामुळे संत्रा उत्पादकांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक असते.

असे करा व्यवस्थापन : रोग प्रतिकारक जातीचा जंबेरी खुंटावर जमिनीपासून १७ सेंटिमीटर अंतरावर डोळे भरावे. पाणी देताना झाडाच्या खोडाला दोन आळे पद्धतीने पाणी द्यावे, त्यामुळे पाण्याचा बुंध्याशी संपर्क येणार नाही. रोगट भागावरील साल खरवडून काढावी व त्यावर बोर्डो पेस्ट लावावी. (एक भाग मोरचूद, एक भाग चुना व आवश्यक तेवढे पाणी) यामुळे रोगकारक बुरशीचा नाश होईल. ज्या ठिकाणाहून डिंक ओघळतो तेथील साल झाडाच्या आतील भागास इजा होणार नाही अशा प्रकारे तीक्ष्ण चाकूने खरवडून काढावी. नंतर १% पोटॅशियम परमँगनेट या द्रावणाने धुवून काढावी. नंतर जखमेवर ५० ग्रॅम मॅटको (मेटॅलॅक्सिल ८% + मॅंकोझेब ६४ %) किंवा फॉसीटिल एएल २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे मिसळून पेस्ट लावावी. डायबॅक हा रोग प्रामुख्याने जंबेरीवर डोळे भरल्याने दिसून येतो. याकरिता पहिली बाब म्हणजे, जंबेरीवर डोळे न भरता इतर सुयोग्य खोडावर डोळे भरून कलमे तयार करावीत. महाराष्ट्राकरिता मार्मालेड, ॲलिमो, रंगपूर संत्र्याचे खोड उपयोगात आणावे.

ट्रिस्टेझा आणि ग्रीनिंग हे रोग मावा व सायला या किडींमुळे पसरतात. या किडीच्या व्यवस्थापनासाठी नागपूरी संत्र्याला नवती आल्यानंतर नीम तेल १०० मिली प्रति १० लीटर पाणी या प्रमाणात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. नीम तेल पाण्यात मिसळत नसल्यामुळे १० ग्रॅम डिटर्जंट पावडर प्रति १०० मिली नीम तेलात मिसळावे किंवा थायोमेथोक्झाम २५ डब्ल्यूजी १ ग्रॅम प्रति १० लीटर पाणी किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही १.५ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.फ



## थोडक्यात



### जिल्हाउपाध्यक्षपदी अब्दुल कादर मकराणी यांची निवड

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेत दैनिक पार्श्वभूमीचे प्रतिनिधी अब्दुल कादर मकराणी यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली असून, त्यांच्या निवडीबद्दल मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस एम देशमुख यांच्या हस्ते सत्कार करुन अभिनंदन केले. अ.कादर मकराणी यांना पत्रकारितेतील गेल्या तीस - पस्तीस वर्षाचा अनुभव आहे .एक अनुभवी आणि पत्रकारांच्या कार्यात नेहमीच सक्रिय सहभाग घेणारे कार्यकर्ते असून, पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि समाजातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर नेहमीच त्यांचा नेहमीच आवाज राहिला आहे. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी प्रभावी काम करतील असे अपेक्षित आहे. अब्दुल कादर मकराणी यांना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यासाठी पाटोदा तालुक्यातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी एकमुखाने मान्यता दिली होती.त्याच्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे परिषदेला बळकटी मिळेल असे असे सर्वांनी मत व्यक्त केले .या निवडीबद्दल सर्व पत्रकार व संघटनेकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, पुढील कार्यकाळात त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांसाठी नवीन संधी आणि सुविधा उपलब्ध होतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. पाटोदा तालुक्यातील पत्रकार अब्दुल कादर मकराणी यांनी लेखणीच्या बळावर आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे. परिषदेने असं.कादर मकराणी यांना परिषदेने जिल्हा उपाध्यक्ष करून नवीन जबाबदारी सोपवली आहे, ती जबाबदारी मकराणी खंबीरपणे पार पाडतील असा विश्वास परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख,व जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे यांनी मत व्यक्त केले

### महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा शहरात बसविण्यात यावा-गणेश शेवाळे

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा शहरातील महात्मा फुले चौकात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा बसवण्यात यावा अशी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली.महात्मा ज्योतिराव फुले यांनी भारतीय समाजातील गोरगरीब,शोषित आणि स्त्री वर्गासाठी क्रांतिकारी काम केले. त्यांनी शिक्षण, समानता आणि समाज सुधारणा यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे आजही त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या योगदानाची महती लक्षात घेता, पाटोदा शहरात त्यांचा पुतळा उभारण्याची आवश्यकता आहे,''महात्मा फुले यांच्या पुतळा बसवण्याची मागणी अनेक वर्षापासून असल्याने पाटोदा नगरपंचायतने त्वरित कार्यवाही करावी. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्यामुळे अनेक गोरगरीब आणि महिलांना समतेची आणि शिक्षणाची दिशा मिळाली. त्यांचा पुतळा बसविल्यास आगामी पिढीला त्यांच्या योगदानाची आठवण होईल आणि सामाजिक न्यायाच्या मार्गावर चालायला प्रेरणा मिळेल.ही मागणी अनेक वर्षापासून असल्याने आता पाटोदा नगरपंचायत आणि सरकारने यावर लवकर निर्णय घ्यावा व पाटोदा शहरात महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा बसविण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली आहे.

### आज बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठक

बीड : ए एम २०३२ बीड लाईव्ह (अप्रतिम महावक्ता - पब्लिक टॅलेंट रियालिटी शो सिरीज २०३२ शाश्वत विकास ध्येयाच्या दिशेने) या पत्रकारांच्या पुढाकारातून राबवयाच्या कार्यक्रम मालिकेअंतर्गत साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली आणि अविनाश पाठक, जिल्हाधिकारी, सचिन पांडकर अप्पर पोलीस अधीक्षक बीड यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठकीचे दि. १० एप्रिल २०२५ गुरुवार रोजी सकाळी १० वाजता, के एस के कॉलेज येथे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील राजकीय, शासकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण, उद्योग व्यापार यासह विविध क्षेत्रातील संस्था तसेच युवा वर्ग, महिला संघटना व नागरिकांच्या सांघिक सहकार्यातून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व नव माध्यमातील पत्रकार आगामी काळासाठी विशेष उपक्रम राबविणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्थातच राजकीय व सर्व क्षेत्रातील सामाजिक संस्थांचा आणि मुख्य म्हणजे शासकीय, निम शासकीय अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. बैठकीमध्ये ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनिल फळे हे सदर कार्यक्रम मालिकेबद्दल सादरीकरण करतील. त्या सादरीकरणाच्या अनुषंगाने आपल्या सूचना व सहकार्य लक्षात घेऊन बीड शहर व जिल्ह्यामध्ये विविध कार्यक्रम राबविले जातील; त्यासंबंधी आपल्या सूचना, सहकार्य व मार्गदर्शन आवश्यक आहे. या बैठकीसाठी संबंधितांनी अवश्य उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक दिलीप खिस्ती, समन्वयक विशाल साळुंके, अनिल जाधव आणि विविध संपादक, पत्रकार संघटना सदस्यांनी केले आहे.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवार रोजी सोपान म. इंगळे शास्त्री यांचे कीर्तन

बीड : विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील आठवी पुण्यतिथी चैत्र शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. सोपान महाराज इंगळे शास्त्री अध्यक्ष इंगळे महाराज परमार्थ आश्रम चिंचवड गाव यांचे शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील



भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व गंगाधर श्रीमंतराव घुमरे, रमेशभाऊ विश्वनाथ घुमरे, बाळासाहेब विश्वनाथ घुमरे, अण्णासाहेब तुकाराम लांडे यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या नुतनीकरणासाठी लिंबागणेश येथे रास्तारोको आंदोलन

## पंचायत समितीच्या आडमुठेपणामळे नुतनीकरण रखडले

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असुन प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे मात्र यासाठी ९० दिवस काम चहा यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत.

त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणा-या मुला मुलींच्या शिक्षणासाठी मदत,सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिका-यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दुर करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० गुरूवार रोजी अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली असुन निवेदन मंडळ अधिकारी श्रीधर साळुंके,तलाठी गणपत पोतदार,तलाठी शेख गफुर,पो. हे. संतोष राऊत, नवनाथ मुंढे, मधुकर तांदळे यांनी स्विकारले. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात , रमेश गायकवाड, पांडुरंग वाणी विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, दादा गायकवाड, शेख खाजु, बांधकाम मिस्त्री सय्यद रफिक, सुधाकर बागल,सय्यद सलीम, सय्यद अकबर, सय्यद आयुब, विलास जाधव, शेषेराव तागड, श्रीराम तागड, भिमराव बोराटे,बंकट लगास, हनुमान अंकुशे,शिवराम गायकवाड, तुकाराम गायकवाड, बन्सी निर्मळ, रामदास निर्मळ, सुधीर क्षीरसागर, सय्यद रियाज, बाळकृष्ण अंकुशे ,बंकट लगास,सय्यद फैय्याज आदी सहभागी होते.

महाराष्ट्रातील बांधकाम कामगार हे राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.रस्ते, ईमारती,पुल आणि इतर अनेक बांधकाम प्रकल्पांवर काम करतात हे काम अतिशय कठीण धोकादायक असते.कामगारांमध्ये पुरूष आणि महिला दोघेही समाविष्ट असतात.बांधकाम क्षेत्रातील कामगार हे बहुतांश वेळा असुरक्षित, असंघटित आणि अल्पशिक्षित असतात तसेच त्यांना नियमित रोजगार, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य मिळत नाही याच कारणांमुळे महाराष्ट्र सरकारने बांधकाम कामगारांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ सारख्या संस्थांची स्थापना केली.या मंडळामार्फत विविध क्षेत्रातील बांधकाम कामगारांची नोंद केली जाते.बांधकाम कामगार योजनेंतर्गत नोंदणीकृत कामगारांसाठी ८४ प्रकारच्या विविध योजना राबविल्या जातात. ज्यामध्ये सामाजिक सुरक्षा योजना, शैक्षणिक योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक योजनांचा समावेश आहे.बांधकाम कामगारांना या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन किंवा आफलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण दरवर्षी करणे बंधनकारक आहे. त्यासाठी ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर ग्रामीण भागात ग्रामविकास अधिकारी यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे पंचायत समितीच्या या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण रखडले असून शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळाच्या योजनेअंतर्गत विविध कल्याणकारी योजना पासून बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबे वंचित आहेत .त्यामुळे शासन स्तरावर जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकाऱ्यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दूर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त माजलगाव शहरात ''समता ज्योत रॅली'' चे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न, संविधान निर्माता, महान समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ''समता ज्योत रॅली'' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली माजलगाव पोलीस प्रशासन आणि शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जात आहे. ही रॅली रात्री ११:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भीमनगर येथे समाप्त होणार आहे. या रॅलीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारसरणीचा जागर, तसेच सामाजिक समतेचा संदेश पोहचविण्यात येणार आहे.

उपविभागीय अधिकारी मा.गौरव इंगोले व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतल यांनी सर्व नागरिकांना या रॅलीमध्ये शिस्तबद्ध व शांततामय पद्धतीने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रॅलीदरम्यान पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहेत. समतेचा दीप घेऊन सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल केवळ डॉ.आंबेडकरांच्या जयंतीपुरते मर्यादित नसून, समतेच्या समाजरचनेच्या दिशेने एक प्रभावी पाऊल ठरेल. ही रॅली केवळ एक मिरवणूक न राहता, सर्वधर्मसमभाव, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे दर्शन घडविणारी प्रेरणादायी घटना ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, रॅलीच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करावे, आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संविधान निटपणे समजून घ्यायला हवे

### जयभिम महोत्सवात ॲड.जयमंगल धनराज यांचे मत

बीड । प्रतिनिधी

देशातल्या प्रत्येक, व्यक्तीने भारतीय संविधान निटपणे समजून घेवून, ते वाचायला हवे. कारण देशात संविधान लागू झाल्यानंतर आमूलाग्र बदल झालेत. शोषित, पीडित, तसेच प्रत्येक समूहाला त्यांचे हक्क आणि अधिकार मिळाले.म्हणून त्यातील कायद्याच्या तरतुदी आणि कायद्या मागचे तत्वज्ञान समजून घ्यायला हवे.तरच आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून येतील. असे विचार ॲड.जयमंगल धनराज यांनी व्यक्त केले. बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, ४ ते १४ एप्रिल या कालावधित जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने बुधवार (दि.९) रोजी आयोजित केलेल्या व्यख्यानमालेत ॲड.जयमंगल धनराज बोलत होते.



या कार्यक्रमाल अध्यक्ष म्हणून पोलीस अधीक्षक नवनित कावत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.राजु शिंदे, प्रा.उत्तम साळवे, सुरेश साबळे आदी उपस्थित होते. उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना ॲड.जयमंगल धनराज म्हणाले की, आज भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होताहेत. त्यामुळे प्रत्येक भारतीयासाठी ही बाब गौरवास्पद आहे. ॲड.जयमंगल धनराज असंही म्हणाले की, देशात आज अनेक आव्हाने आहेत.त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. ध्येय आणि धोरणे यावर कायदे करण्यासाठी संविधानात, निर्देश आहेत.मात्र तशी प्रक्रिया आज राज्यकर्त्यांकडून होताना दिसून येत नाही. देशातील जनतेने आता सुज्ञ होणे गरजेचे आहे. असे परखड मत ॲड.जयमंगल धनराज यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय मनोगतात, पोलीस अधीक्षक नवनित म्हणाले की,भारतीय संविधान जगात श्रेष्ठ आहे.कारण विविध जाती-धर्म, भाषा-प्रांत, वेश-भूषा असलेले नागरिक एकसंघ रहातात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने संविधान वाचावे.असे मत पोलीस अधीक्षक नवनित म्हणाले. या व्याख्यान मालेचे प्रस्ताविक प्रा.प्रदिप रोडे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड.नितीन वाघमारे तर आभार ॲड.राजेश शिंदे यांनी मानले.दरम्यान जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

## नागपूर येथील पीडितांचे पुनर्वसन करा-हाजी शेख जाकेर

बीड । प्रतिनिधी

ऑल इंडिया मुस्लिम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर महेबुब वो तहेरीके औकाफ चे जिल्हाध्यक्ष खुर्शिद आलम यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे विविध मागण्यांचे एक सविस्तर निवेदन सादर केले असून त्यामध्ये तीन महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे.वक्फ बिल २०२५ कायदा रद्द करण्याची मागणी करण्यात आली या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने २०२५ मध्ये सादर केलेले नवीन वक्फ बिल हे पूर्णतः असंवैधानिक आहे. यामध्ये पूर्वीच्या संविधानिक तरतुदींमध्ये अनावश्यक बदल करून मुस्लिम समाजाच्या धार्मिक व सामाजिक हिताला बाधा निर्माण केली आहे. त्यामुळे हे वक्फ बिल तात्काळ रद्द करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच अर्धमसला मशिद बॉम्बस्फोट प्रकरणात सखोल चौकशीची मागणी: बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील मक्का मशिदीत झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात आरोपींना



दोषी धरण्यात आले आहे, मात्र या प्रकरणाची अजूनही सखोल चौकशी झालेली नाही. निवेदनात या प्रकरणातील मास्टरमाइंडचा शोध घेऊन खरी माहिती बाहेर काढावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नागपूरमधील दंगलीनंतर पीडितांचे पुनर्वसन व्हावे: नागपूर येथे झालेल्या दंगलीदरम्यान अनेक निर्दोष नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते तसेच काहींची घरे बुलडोझरने पाडण्यात आली होती. निवेदनात या प्रकरणातील बेकायदेशीर गुन्हे मागे घेऊन, घरांचे त्वरित पुनर्वसन करावे, अशी नम्र मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतावेळी जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर , तहेरीके ओकाफ चे जिल्हाध्यक्ष खुर्शिद आलम, तालुकाध्यक्ष सय्यद फेरोज अली , शहराध्यक्ष मोमीन खालेक, संघटक सलाम शेठ, कोषाध्यक्ष शफिक तांबोली, संघटक शेख वजीर अत्तर, सदस्य शफिक इनामदार, व आधी यांची स्वाक्षरी असून त्यांनी प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कारवाई करावी, अशी विनंती केली आहे.

## महापुरुष स्पर्धेचे पारितोषिक वितरण

### विद्यार्थ्यांनी नोंदवला उत्स्फुर्त सहभाग

बीड/प्रतिनिधी । प्रतिनिधी

राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून गुरुवार (दि.३) एप्रिल रोजी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तालुका पातळीचर घेण्यात आली होती. त्या परीक्षेला एकूण एक हजार विद्यार्थी बसले होते, त्यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे रविवार (दि.६) एप्रिल रोजी पार पडली त्यामध्ये शेकडो विद्यार्थी परीक्षेस होते.

स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महापुरुष सामान्य ज्ञान समितीचे प्रमुख प्रा. अशोक गायकवाड,भारत मगर,प्राचार्य प्रदीप गाडे,सुमेध जोगदंड, ॲड.राजेश शिंदे, महादेव इनकर यांनी सुयोग्य नियोजन केले होते. अंतिम परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम शोएब शौकत आतार, प्रिती उगले, शिवानी गाडेकर, उत्तेजनार्थ तुमी उपरे, पृथ्वीराज उगले, संघवी जोगदंड, अन्वी जोगदंड यांना वितरित करण्यात आले.

## माणूसच माणसाला मारतोय,माणसातला माणूस ओळखा-डॉ.जलाल महाराज

### आष्टीत महावीर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानाने उपस्थितांची मने जिंकली

आष्टी । प्रतिनिधी

जर तुमचं मनच स्वच्छ होत नसेल तर कुठे जायचे काय गरज,त्यामुळेच आपण कोण आहोत हे अगोदर ज्ञात होणे गरजेचे आहे. माणूस प्रगतीसाठी प्रयत्न करत नाही तो अदोगतीसाठी जास्त प्रयत्न करत असून त्यामुळे प्रत्येकाने माणसातला माणूस ओळखला पाहिजे.मात्र आजच्या परिस्थितीत माणुस माणसाला मारतोय असे प्रतिपादन नाशिक येथील प्रसिध्द कीर्तनकार व्याख्याते डॉ.जलाल महाराज सय्यद यांनी केले. आष्टी येथे सकल जैन समाजाच्यावतीने आयोजित भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक..२०२५ भगवान महावीर स्वामी जयंतीच्यानिमित्ताने अरे माणसा माणसा या विषयाला घेऊन व्याख्यानमालेत ते बोलत होते.

मुस्लिम कुटुंबात जन्म झालेल्या डॉ.जलाल महाराजांनी वारकरी संप्रदायाचा अंगीकार केला असून



रामनाम गजर करीत समाज प्रबोधन करून नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातीच्या करंजी खुर्द या गावचे ते रहिवासी आहेत.डॉ.जलाल महाराजांच्या तीन पिढ्या वारकरी संप्रदायाची जोडलेल्या असून रामायणावर त्यांनी पीएचडी अर्थात डॉक्टरेट मिळवली आहे.मराठी आणि हिंदी या भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे.राम आणि अल्लाह वेगळे नाहीत,या सर्वधर्मसमभावाचा त्यांनी अंगीकार केला असून यांचे अनेक दाखले देत त्यांनी आपल्या श्रुश्राव्य व्याख्यानाने उपस्थित आष्टीकरांचे मने जिंकले.सामाजिक सलोखा कसा असावा याचे अनेक मूर्तीमंत उदाहरण देत त्यांनी आपल्या व्याख्यानातून जातीपातीच्या भिंती दूर करा असा संदेश उपस्थितीना देत माणसाने माणसातला माणूस ओळखकला तरच की माणुसकी जिवंत राहील असे माणूस या शब्दाला धरत एकात्मतेचे आवाहन करत अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी दिले.

ते यावेळी पुढे आपल्या व्याख्यानात बोलताना म्हणाले,आपण लोकांचाच विचार करत बसत आहोत आणि आपले तसेच राहून जाते यांचा विचार आपण करत नाहीत. हे जग काल होत उद्या पण राहील आपण मात्र उपरे आहोत. हे लक्षात राहू द्या.आपल्यात बाहेरून आलेले लोक जातीवाद पसरवत आहेत.त्याकडे आपण लक्ष न देता आपल्यातली माणुसकी आपण जपणे काळाची गरज आहे.त्याच विचाराने राज्य व देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात गेलो तरी मी आजपर्यंत माणुसकीच जपत आलो आहे. आज माणसाकडे पद, प्रतिष्ठा, पैसा थोडा आला की माणूस माणुसकी विसरून जातो.त्याचबरोबर जातीपातीच्या नावाखाली तो माणुसकी विसरून गेला आहे.ज्यावेळेस माणूस जात बाजूला ठेऊन माणसाकडे माणूस म्हणून पाहील त्यावेळेस नक्कीच जात शिल्लक राहणार नाही.असेही शेवटी डॉ.जलाल महाराज यांनी सांगितले. यावेळी माजी आ.साहेबराव दरेकर,नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, सुखलाल मुथ्था,दिनकर तांदळे,डा.मधुकर हंबर्डे,डा.विलासराव सोनवणे,डॉ.नदीम शेख,ॲड.वालिमक निकाळजे,आण्णासाहेब चौधरी,संतोषशेठ मेहेर,संजयशेठ मेहेर, डा.श्रीकांत कुलकर्णी, पत्रकार उत्तम बोडखे,शरद तळेकर, प्रविण पोकळे,शरद रेडेकर, मुजाहद्दीन सय्यद, राजेंद्र लाड,हरीष हातवटे, सोपान जोगदंड,सुनिल मेहेर, विजय बोगावत, विजयशेठ मेहेर,संजय थोरवे, किशोर झरेकर,तय्यब सय्यद, सय्यद शफी,टाटा शेठ,भाऊसाहेब कोकणे,राहुल मुथ्था,प्रा.मोहन धोंडे,अमोल भंडारी,प्रीतम बोगावत,अक्षय हळपावत,पारस मेहेर,श्रेयस मेहेर,अक्षय कासवा,प्रीतम कासवा,शिवलाल कटारिया, निखील कटारिया,कपिल अग्रवाल, सचिन कदम सर,अमोल कदम सर,आदि सामाजिक, राजकीय, धार्मिक,व्यापार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्या शिबिरात ६१ जणांचे उत्स्फूर्त रक्तदान

## विविध उपक्रम राबविणार –महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघाच्या वतीने यावर्षी ही क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरी केली जाणार आहे. जयंतीच्या निमित्ताने गुरूवारी आयोजित शिबिरात ६१ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी येथील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने अंबाजोगाईत आज ११ एप्रिल २०२५ रोजी १९७ वा क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या जयंती उत्सवानिमित्त गुरूवार, दिनांक १० एप्रिल रोजी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून शांतीनाथ बनसोडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दिपक फुटाणे हे उपस्थित होते. शिबिराचे उद्घाटनानंतर ६१ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले. यावेळी शिबिर उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.के.मसने यांनी केले. तर उपस्थितांचे आभार राम घोडके यांनी मानले. महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघाच्या माध्यमातून यावर्षी ही क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अभिवादन, रक्तदान शिबीर, अभिवादन



रॅली, वृक्ष वाटप आणि प्रबोधनपर व्याख्यान आदी विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरी करण्यात येणार आहे. रक्तदान शिबिर प्रसंगी प्रकाश बलुतकर, विष्णु राऊत, अंकुश घोडके, राम जिरे, संतोष राऊत, अनंत मसने, डॉ.दत्तात्रय मसने, भागवत मसने, गणेश जाधव, करपुडे सर, ज्ञानेश्वर जिरे, बालासाहेब माळी, मधुकर घोडके, बंडू मसने, रमेश जिरे, बलुतकर सर, मिलिंद बाबजे, पंकज राऊत, नितीन जिरे, मंगेश बलुतकर, राहुल माळी, अभय जिरे, निवृत्ती जिरे, संदेश डाके, शरद माळी, भारत घोडके, श्रीकृष्ण घोडके, बळीराम धनवडे, आकाश चोपने, गजानन घोडके, प्रविण चोपने, योगेश कातळे, अक्षय घोडके, बालाजी घोडके, बालाजी जिरे, दिपक आरसुडे, ऋषि मसने, कृष्णा मसने, नवनाथ माळी, अनिकेत घोडके, पवन घोडके, अनुज घोडके, विशाल, महेश, अक्षय चोपने, पवन जिरे, दामोदर माळी, भागवत जिरे, किरण भालेकर, सुधीर माळी, रोहन माळी, बाळु फुलझळके, दत्तात्रय बनसोडे, शाहीर तुकाराम, प्रविण जोगदंड, राहुल जिरे, अतुल राऊत, सतिश राऊत, शिवराज राऊत, संदीपान देशमाने, गोविंद पाथरकर, ऋषि पाथरकर, किरण पाथरकर, नंदकुमार बलुतकर, सुमीत सुनील राऊत, प्रदीप चोपणे, गोविंद पाथरकर, सुजीत बोते, अमोल जिरे, भागवत जिरे, दिनेश घोडके, विजय जिरे, महेश घोडके, सागर साखरे, प्रशांत राजमाने, प्रकाश चोपणे, सुरज राऊत, सुशील शिंदे, दयानंद दगडू राऊत, प्रज्ज्वल राऊत, उद्धव जिरे, उदय घोडके, बाळासाहेब जिरे, सुधीर डोके, गणेश डाके, पप्पू जिरे आदींसह समाज बांधवांची उपस्थिती होती. रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी लवकरच नदीपात्रात सोडणार!

## प्रशासनाचे ग्रामस्थांना आश्वासन; शुक्रवारी होणारे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

उन्हामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई आणि पशुपक्षी तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केली होती. गुरुवारी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावाला भेट देऊन शुक्रवारी होणारे रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्याची विनंती करून पाणी सोडण्याचे ठोस आश्वासन दिले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जवळ आलेली असून आंदोलनामुळे जयंतीच्या उत्साहात व्यत्यय येऊ नये



यासाठी आम्ही हे आंदोलन स्थगित करत आहोत. येत्या २० एप्रिल पर्यंत पाणी सोडले नाही तर २२ एप्रिल रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

याबाबत अधिक असे की, कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. पाणी न सोडल्यास दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार होते. आंदोलनाच्या पूर्वसंध्येला परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता लोंढे, तलाठी विष्णू गित्ते, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महझरअली तसेच प्रशासनातील अन्य अधिकाऱ्यांनी कन्हेरवाडी गावात जाऊन हनुमान मंदिर येथे बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. १४ एप्रिल रोजी राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. देशभरात याचा मोठा उत्साह असतो. आंदोलनामुळे कुठल्याही कार्यक्रमात व्यत्यय येणार नाही अशी भूमिका यावेळी घेण्यात आली. तसेच येत्या २० एप्रिल पर्यंत पाणी नदीपात्रात सोडण्याची कारवाई होईल असे आश्वासन तहसीलदार यांनी देऊन उद्याचे आंदोलन स्थगित करण्याची विनंती केल्यानंतर रास्ता रोको स्थगित करण्यात आला. प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन आम्ही आंदोलन स्थगित केले आहे, मागे घेतलेले नाही. २० एप्रिल पर्यंत पाणी नदीपात्रात सोडण्यात आले नाही तर येत्या २२ एप्रिल रोजी स्थगित केलेले आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी दिला. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाइस चेअरमन मिनिनाथ दादा फड, माजी उपसरपंच रामहरी फड, पोलिस पाटील प्रल्हाद मुंडे, एच.यू.फड, बाबासाहेब फड, वसंत मुंडे, प्रशांत रोडे, मधुकर मुंडे टेलर, नवनाथ अप्पा फड, नाथराव फड, सुरेश घाडगे, महादेव मामा मुंडे, हरीकिशन बहिरे, संतोष मुंडे, वैजनाथ रोडे, ज्ञानेश्वर फड, समाधान मुंडे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# व्यसन व फॅशनमुळे समाज बिघडला ह.भ.प. शिवलीलाताई पाटील

**चौसाळा । प्रतिनिधी**

समाजामध्ये व्यसनाचे प्रमाण वाढतच चालले आहे दारूच्या व्यसनाने अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत दारू पिणे सोडणे असल्यास त्याला गोळ्या औषधे इंजेक्शन देण्यापेक्षा मनातून त्याने न दारू पिण्याचा निर्धार करणे हे महत्त्वाच्या असून तरच दारू सोडली जाते व्यसनाने व नवीन आलेल्या फॅशनेमुळे समाज बिघडला गेला आहे समाज अधोगतीकडे जात असल्याचे . ह भ प शिवलीला ताई पाटील यांनी आपल्या कीर्तनातून स्पष्ट केले आहे चौसाळा तालुका बीड येथे चंदन सावली उर्स निमित्ताने ह भ प शिवलीलाताई पाटील यांचा कीर्तनाचा कार्यक्रम ९ एप्रिल रोजी आयोजित केला होता आपल्या कीर्तनातून शिवलीला ताई पाटील यांनी स्पष्ट केले की प्रथमतः चौसाळा ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानते कारण त्यांनी उरूस च्या कार्यक्रमात कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे हे एक विशेष असल्याचे सांगून कपाळावर टिळा गळ्यात माळ घालून नागरिकांनी शाकाहारी आहार घेऊन देवाचे नामस्मरण करावे असे सुचविले चंदन शहावली उर्स कमिटीच्या वतीने व चौसाळा ग्रामस्थांच्या वतीने उपसरपंच अंकुशराव कळसे यांच्या कुटुंबाच्या वतीने ह भ प शिवलिलाताई पाटील यांचे स्वागत करून त्यांना सत्कारित करण्यात आले या कीर्तनाच्या कार्यक्रमाला उरूस कमिटीचे पदाधिकारी गावातील भजनी मंडळ असंख्य संख्येने महिला व पुरुष या कार्यक्रमाला हजर होते



# भाटवडगाव ग्रामपंचायत, ओपन स्पेस व रस्ता अडविला प्रकरणी आज चौकशी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत ओपन स्पेस व रस्ता अडविला प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे यांनी उपोषण करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई ची मागणी केली होती त्या प्रकारणाची चौकशी आज शुक्रवार दि ११ एप्रिल रोजी होणार आहे अशी माहिती उपोषण कर्त्यानी दिली आहे.**

या विषयी माहिती अशी की तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १६० मधील ओपन स्पेस ची खरेदी विक्री केली आहे याची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी व गट नंबर १३८ हा शहराला खेटून आहे या मध्ये सार्वजनिक रस्ताच प्लॉट म्हणून खरेदी विक्री केली व रस्त्यावर पत्र्याचे शेड उभारून रहिवासी व विद्यार्थ्यांची रहदारी बंद करून गैरसोय केली आहे तर हा प्लोटच नकाशात नसुन रस्ता च दाखवला आहे व एका दस्तावेज मध्ये त्याची चतुर्सिमा बदलुन प्लॉट म्हणून विक्री केली आहे या रस्त्याची खरेदी विक्री करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी व रस्ता पुर्ववत रहदारीस चालू करून द्यावा अशी मागणी केली आहे या प्रकरणी आज दि ११ एप्रिल रोज शुक्रवारी विस्तार अधिकारी पंचायत हे चौकशी करणार आहेत स्थळ पाहाणी करून जेथे रस्ता अडवून रहदारीस मज्जाव केला त्या ठिकाणी चौकशी करावी अशी मागणी रहिवासी यांनी केले आहे.

# राजकिशोर मोदी यांच्याकडून जगाला अहिंसेच्या मार्गावर नेणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या प्रतिमेचे पुजन व जैन बांधवास शुभेच्छा


अंबाजोगाई । प्रतिनिधी

संपूर्ण जगाला अहिंसेचा संदेशासोबतच अहिंसेच्या मार्ग दाखवणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या जयंतीनिमित्त आज अंबाजोगाई शहरात निघालेल्या भगवान श्री महावीर यांच्या भव्यदिव्य अशा मिरवणुकी दरम्यान महावीर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन शहरातील सर्व जैन बांधवांस भगवान श्री महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.या मिरवणुकीत अंबाजोगाई शहरातील सर्व जैन महिला व पुरुष पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते.



याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की जगाला अशांती व हिंसेच्या प्रवृत्ती पासून दूर नेण्यासाठी भगवान श्री महावीर यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी ध्यान धारणा व तपस्या प्रारंभ केली. त्यानंतर धर्म व अहिंसा याचा प्रचार जगभर केला. वयाच्या ७२ व्या वर्षी महावीरांचे निधन झाले. जैन बांधव हे भगवान श्री महावीर यांच्या जन्म व निधनाच्या दिवशी घरोघरी दिवे लावतात. भगवान महावीर म्हणतात की, कळत नकळत देखील आपल्या हातून कोणाची हिंसा होणे हे अयोग्य आहे. त्याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये किंवा कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये अशी भगवान श्री महावीरांची शिकवण असल्याचे मोदी यांनी नमूद केले. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये, स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतः प्रति द्वेष वाढवत असतो असेही भगवान श्री महावीरांचे मत होते अशी स्पस्टोक्ती राजकिशोर मोदी यांनी यादरम्यान दिली. सध्या सर्वत्र राजकीय तथा सामाजिक दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा वातावरणात भगवान श्री महावीरांची शांती तथा अहिंसेची शिकवण खऱ्या अर्थाने उपयोगी पडणार असल्याचे परखड मत राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

# दत्त संस्थान बालाघाट येथे चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरी होणार



**बीड । प्रतिनिधी**

येथे जवळ असलेले श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने, दत्त उपासक श्री.वैजनाथ महाराज शिंदे यांच्या अधिपत्याखाली चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा ◀◀ पान ३ वर

# बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठक उत्साहात संपन्न

## मान्यवरांसह विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

ए एम २०३२ बीड लाईव्ह (अप्रतिम महावक्ता – पब्लिक टॅलेंट रियालिटी शो सिरीज २०३२ शाश्वत विकास ध्येयाच्या दिशेने) या पत्रकारांच्या पुढाकारातून राबवयाच्या कार्यक्रम मालिके अंतर्गत शहरातील के एस के महाविद्यालयात आयोजित केलेली जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठक गुरुवार दि. १० एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात पार पडली. बैठकीला मान्यवरांसह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, संपादक, पत्रकार आणि शासकीय अधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.





साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या तथा बीड शहराच्या माजी नगराध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली सदरील बैठक पार पडली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, सामाजिक कार्यकर्ते अशोक तांगडे, ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनिल फळे, कार्यक्रमाचे संयोजक संपादक दिलीप खिस्ती, संपादक पुरुषोत्तम अण्णा गावरस्कर, समन्वयक पत्रकार विशाल साळुंके, पत्रकार अनिल जाधव उपस्थित होते. प्रस्ताविक करताना, संयोजक पत्रकार दिलीप खिस्ती यांनी सध्याची बीड जिल्ह्याची परिस्थिती कथन करीत जिल्ह्यातील राजकीय, शासकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण, उद्योग व्यापार यासह विविध क्षेत्रात काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. शाश्वत विकासाच्या ध्येयाने प्रेरित ◀◀ पान ३ वर

# प्रा.रंगनाथ तिवारी यांना इतिहास तज्ञ पंडीत सेतू माधवराव पगडी पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या ३२ व्या राष्ट्रीय अधिवेशन दि. १७ व १८ जानेवारी २०२५ या काळात घेण्यात आले होते. या अधिवेशनात एकमुखी निर्णय घेण्यात आला. इतिहासाचे गाढे अभ्यासक बाबा आमटे चे माणसपुत्र गांधी विचाराचे भक्त प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी नाव सुचवले त्यास एकमुखाने मान्यता देण्यात आली. हे अधिवेशन नेताजी शिक्षण संस्थेचे सुभाष बाबुराव कुल, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केडगाव ता.दौंड जि.पुणे यांच्या वतीने कार्यवाह प्राचार्य डॉ.वैरागे यांच्या व प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रा.रंगनाथ तिवारी यांना त्यांच्या अंबाजोगाई येथील राहत्या घरी प्रदान करण्यात आला.



यावेळी मानवलोक संस्थेचे कार्यवाह अनिकेत लोहिया, प्रा.नानासाहेब गाठाळ, इतिहासाचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ.साहेबराव गाठाळ तसेच साहित्यिक प्रा.गौतम गायकवाड, ज्येष्ठ नागरिक बाभुळगावकर, प्रा.राम चौधरी आणि अनुवादक प्रा.श्रीनाथ तिवारी आणि त्यांचे कुटूंब यावेळी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी हा पुरस्कार देताना एका उत्कृष्ठ ऐतिहासिक कांदबरी काराला देण्यात आल्याने पुरस्काराची आणि पुरस्कार घेणार्यांचीही उंची वाढलेली आहे. प्रा.रंगनाथ तिवारी यांनी अनेक मानाचे पुरस्कार मिळाले असले तरी हा पुरस्कार पं.सेतु माधवराव पगडी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार, दि.११ एप्रिल २०२५ । पान ७

# दहा वर्षांनी झालेल्या जुळ्या लेकरांना आईने पाण्यात बुडवून मारले

पुणे । प्रतिनिधी

हवेली तालुक्यातील थेऊर ग्रामपंचायत हद्दीतून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे, एका जन्मदात्या आईनेच आपल्या दोन चिमुकल्या बाळांना पाण्याच्या टाकीत बुडवून जीव घेतल्याची घटना घडली आहे. एवढंच नाही तर स्वतःने देखील आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना थेऊर (ता. हवेली) येथील दत्तनगर परिसरात मंगळवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

प्रतिभा हेमंतकुमार मोहिते, (वय-३६, सध्या रा. दत्तनगर, थेऊर, ता. हवेली मूळ रा. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी या महिलेच्या भावाने लोणी काळभोर पोलिसांकडे फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी ३५ वर्षांच्या महिलेवर खुनाचा गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे.





टेस्ट ट्युब बेबीकरिता मोठ्या प्रमाणावर खर्च करून दोन जुळी मुले झाली. मात्र, त्यांची वाढ योग्यरीत्या होत नसल्याच्या तणावापोटी आईने दोन महिन्यांच्या जुळ्या मुलांना छतावरील प्लास्टिकच्या पाण्याच्या टाकीत बुडवून जिवे मारले. मुल होत नसल्याने त्यांनी मोठा खर्च करून टेस्ट ट्युब बेबीचा पर्याय निवडला. त्यामुळे गेल्या एक वर्षापासून त्या माहेरी दत्तनगर थेऊर येथे आल्या होत्या.

या बाळंतपणात महिलाही खूप अशक्त झाली असून, त्यांना काही आजार झाला आहे. टाकीमधील पाण्यात दोन्ही बाळांना बुडविले व स्वतः त्यात उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. दरम्यान, टाकीचे तोंड लहान असल्याने व पाणी जास्त असल्याने टाकीच्या आत प्रतिभा मोहिते या पाण्यात बुडाल्या नाहीत. दोन तीन वेळेस टाकीतून डोके वरती आल्याने समोर राहणाऱ्या एका व्यक्तीने टेरेसवरून हा प्रकार पहिला आणि महिलेचा जीव वाचला.

मुलांना नागरिकांच्या मदतीने वानवडी येथील कमांड हॉस्पिटल येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दोघांचाही उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ पाचचे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी या महिलेवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार तपास करीत आहेत.

# उत्पादन शुल्क विभागाला ३ हजार कोटींचा महसूल

पुणे । प्रतिनिधी

एकीकडे अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीला लगाम, तर दुसरीकडे महसूल वाढीसाठी प्रोत्साहन देत पुणे राज्य उत्पादन शुल्क विभागाने चालू आर्थिक वर्षात जिल्ह्यातून तब्बल तीन हजार कोटींचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा केला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत महसुलात ९.८५ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तर २०२३-२४ मध्ये महसूल २ हजार ७२९ कोटी ४४ लाखाच्या घरात होता.





बनावट मद्यनिर्मिती आणि बेकायदेशीर मद्य वाहतूक व विक्री रोखण्याचे मोठे आव्हान उत्पादन शुल्क विभागापुढे असते. या विभागाकडून मद्यार्कयुक्त पदार्थांवर उत्पादन शुल्क आकारले जाते. तसेच मद्यार्कयुक्त पदार्थांवर नियंत्रण ठेवणे आणि त्यासंदर्भातल्या गुन्ह्यांचे अन्वेषण करण्याचीही जबाबदारी उत्पादन शुल्क विभागाकडे असते. तसेच दारूनिर्मितीसह परराज्यातून छुप्या पद्धतीने जिल्ह्यात येणारी कोट्यवधींची दारू जप्त केली. अनेक गावठी दारूअड्ड्यांवर कारवाई करून आरोपींना अटकदेखील केली. या सर्व कारणांमुळे उत्पादन शुल्कच्या महसुलात वाढ झाली आहे. ही कामगिरी उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे उत्पादन शुल्क विभागाने केली आहे.

एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ दरम्यान, अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक आणि विक्री करणार्यांविरुद्ध ५ हजार ९९५ गुन्हे दाखल केले असून, ५ हजार ८९१ आरोपींना अटक केली आहे. तसेच ६२१ वाहने जप्त करून २५ कोटी ८० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत गुन्हे अन्वेषणाची कामगिरी ४० टक्क्यांनी वाढल्याचे दिसून आले आहे.

# नोकरदारांना रिक्षा परवाना परत करण्याचे आवाहन

जाधववाडी : शहरातील काही नोकरदारांकडे रिक्षा परवाना (परमिट) असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आता खासगी अथवा सरकारी नोकरी करत असाल आणि तुमच्याकडे रिक्षा परमीट असेल; तर ते ३० एप्रिलपर्यंत परत करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) करण्यात आले आहे. नोकरी करत असताना देखील रिक्षा परवाना असणाऱ्या नोकरदारांवर ३० एप्रिलनंतर कारवाई करण्याचा इशारा आरटीओने दिला आहे.



शहरात असंख्य नागरिक सार्वजनिक व खासगी वाहनांचा वापर करतात. नागरिकांच्या सोईसाठी राज्य परिवहन विभागाकडून खासगी वाहतुकीसाठी रिक्षाला परमीट दिले जाते. मोटार वाहन कायद्यानुसार हे परवाने दिले जातात. लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात रिक्षा कमी असल्याचे लक्षात आल्यानंतर आरटीओकडून २०१७ मध्ये नवीन रिक्षांना परवाने देण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे अनेकांनी रिक्षा घेऊन परवाने घेतले. त्यामुळे रिक्षांमध्ये देखील स्पर्धा निर्माण झाली.

मोटार वाहन कायद्यानुसार तीन आसनी रिक्षा परवाना देताना संबंधित व्यक्ती सरकारी, निमसरकारी, निमसरकारी, खासगी कंपनी किंवा इतर कोणत्याही संस्थेत नोकरी करत नसल्याची अट आहे. रिक्षा परवाना देण्यासाठी संबंधित व्यक्तीकडून याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात येते.

रिक्षा परवाना घेतल्यानंतर नोकरी मिळाल्यास त्या व्यक्तींनी त्यांचा रिक्षा परवाना स्वच्छेने परत करणे आवश्यक आहे. अशा व्यक्तींनी येत्या ३० एप्रिलपर्यंत रिक्षा परवाने परत करावेत, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे

# वडगाव काशीबेग येथे मुलींच्या कुस्त्या ठरल्या लक्षवेधी

मंचर । प्रतिनिधी

श्रीराम उत्सवानिमित्त श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग (ता.आंबेगाव) येथे कुस्त्यांचा जंगी आखाडा पार पडला. आखाड्यात नामवंत पैलवानांनी सहभाग घेतला. अनेक कुस्त्या चितपट झाल्या. मुलींच्या कुस्त्या लक्षवेधी ठरल्या.

श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथे श्रीराम उत्सवानिमित्त दौलत महाराष्ट्राची करमणुकीचा कार्यक्रम झाला. कुस्त्यांचा जंगी आखाडा पार पडला. त्यासाठी गावालगत असलेल्या शेतामध्ये विशेष मैदान तयार करण्यात आले होते. पंचमंडळी मैदानात गेल्यानंतर श्रीफळ वाढवून कुस्त्यांच्या आखाड्याला प्रारंभ झाला. सुरुवातीला छोट्या मुलांच्या कुस्त्या झाल्या. यातील अनेक मुलांनी चमक दाखविली. त्यानंतर मुख्य कुस्त्यांना प्रारंभ झाला. पैलवानांना मैदानातून फिरून प्रतिस्पर्धी निश्चित केला जात होता. त्यानंतर हलगीच्या निनादात कुस्त्या झाल्या. बहुतेक कुस्त्या चितपट झाल्या. त्यावेळी उपस्थित प्रेषक टाळ्या वाजवून दाद देत होते. पुणे जिल्ह्याबरोबरच इतर भागातूनही पैलवान आले होते. विजेत्या पैलवानांना यात्रा कमिटीच्या वतीने रोख बक्षीस देण्यात आले. तसेच अनेक ग्रामस्थांनी वैयक्तिक बक्षिसे देऊन विजेत्या पैलवानांना प्रोत्साहन दिले. येथील कुस्त्यांच्या आखाड्यात महिला पैलवान सहभागी झाले होते. विशेषता मंगरूळ, पारगाव येथील संजीवनी चव्हाण व मोनिका चव्हाण या दोन बहिणींची कुस्ती लावण्यात आली.

निर्धारित वेळेत कुस्ती झाली नाही.त्यामुळे या दोन्ही मुलींना बक्षीस देण्यात आले. कुस्ती चांगली झाल्याने उपस्थित ग्रामस्थांनीही दोन्ही बहिणींना रोख बक्षीस देऊ केले. दरम्यान पंच म्हणून लव्हाजी पिंगळे व संजय तारु यांनी काम पाहिले. शंकरराव डोके,बाळासाहेब पिंगळे, सरपंच वैभव पोखरकर, श्रीकृष्ण पतसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पिंगळे आदींसह ग्रामस्थांनी व्यवस्था पाहिली.

# आगीत वडिलांसह मुलाचा मृत्यू

पुणे : शॉर्टसर्किट झाल्यानंतर गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत वडील आणि मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना वारजे भागातील गोकूळनगर पठारावर मंगळवारी (दि.८) मध्यरात्री घडली. मोहन माणिक चव्हाण (वय ४३), पप्पू मोहन चव्हाण (वय २३, दोघे सध्या रा. गोकूळनगर, वारजे माळवाडी, मूळ- तेलंगणा) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी वारजे पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, गोकूळनगर भागात एका पत्र्याच्या खोलीत मोहन आणि पप्पु राहायला होते. मध्यरात्री सिलिंडरमधून गॅस गळती होऊन स्फोट झाल्याची माहिती वारजे अग्निशमन केंद्राला मिळाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख प्रभाकर उमराटकर, तांडेल मरळ, जवान भिलारे, माने, साळुंखे, ओव्हाळ यांच्यासह जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. दोघांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली.



शॉर्टसर्किट झाल्यानंतर घरात आग लागली. त्या वेळी ते गाढ झोपेत होते. आग लागल्यानंतर दोघे जण झोपेतून जागे झाले. त्यानंतर ते घरातील मोरीत लपले. खोलीतील स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरला आग लागून स्फोट झाला. या घटनेत दोघे जण गंभीर जखमी झाले, अशी माहिती अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख प्रभाकर उमराटकर यांनी दिली. वारजे पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

# आधी अत्याचार केले मग पीडितेकडून उकळली १४ लाखांची खंडणी

बारामती : बारामती तालुक्यातील माळेगाव पोलीस ठाण्यात एका महिलेने गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये या महिलेवर तिघांनी सामूहिक अत्याचार केले. त्याचे व्हीडीओ, फोटो काढत तिला ब्लॅकमेल करून तिच्याकडून सुमारे १४ लाखांची खंडणी घेतली. शिवाय तिला पुढे करत एका सामाजिक कार्यकर्त्याच्या खूनाचे प्लॅनिंग करण्यात आले. महिलेने खूनाच्या प्रकरणात सहभागाला नकार देत यासंबंधी थेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.



महिलेच्या फिर्यादीवरून गणेश सर्जेराव पवार (रा. प्रगतीनगर, तांदूळवाडी रोड, बारामती), अनिल शिवाजी गुणवरे (रा. श्रीरामनगर, बारामती), वाघ (पूर्ण नाव, पत्ता नाही) एक अनोळखी यूट्यूबर (नाव, पत्ता नाही), महेंद्र उर्फ भाऊ खैरे (पूर्ण नाव, पत्ता नाही), पिसे (पूर्ण नाव, पत्ता नाही) या सहाजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सप्टेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ही घटना घडली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, या गुन्ह्यातील पीडित महिला ही मुलाच्या शिक्षणाच्या निमित्ताने माळेगावमध्ये राहते. दरम्यान ती माळेगावमधील एका जीममध्ये व्यायामला जात असताना तिची गणेश पवार याच्याशी ओळख झाली. ओळखीतून पुढे एकमेकांचे मोबाईल क्रमांक घेत संपर्क झाला. गणेश पवार याने महिलेच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. त्याचे व्हिडीओ, फोटोज त्याने काढले. त्याचा वापर करत तिला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. त्यातून त्याने महिलेकडून मित्राच्या खात्यावर वेगवेगळ्या वेळी अकरा लाख सत्तर हजार रुपये खंडणी स्वरूपात घेतले. याशिवाय या महिलेवर माळेगाव, सुयश हॉटेल भिगवण, तापोळा, या व इतर ठिकाणी इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध केले. पवार, महेंद्र खैरे, पिसे यांनी तिला धाक दाखवत तिरुपतीला नेले. तेथून परतत असताना तिच्यावर सामुहिक अत्याचार केला. तेथून परतल्यावर त्यांनी तिची भेट एका यूट्यूबरशी भेट घालून दिली. हे पत्रकार असून ते व्हीडीओ प्रसिद्ध करतील अशी भिती घालत त्यालाही पैसे द्यायला लावले.

व्हिडीओ आणि फोटो व्हायरल होवू नयेत या भितीपोटी ही महिला गप्प होती. सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र टिंगरे यांच्या खूनाचा कट त्यांनी आखला होता. तु टिंगरे यांना नादी लाव, त्यानंतर त्यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल कर अशी मागणी आरोपींनी केली. या महिलेने त्यास नकार दिल्यावर आरोपीनी या महिलेमार्फत मच्छिन्द्र टिंगरे यास कुठल्यातरी माळरानावर बोलवून घेऊन त्यांचा खून करण्याचा कट आखला होता, अशी धक्कादायक माहिती महिलेने फिर्यादीत नमूद केली आहे.

# एएम इन्फोवेब फाऊंडेशनतर्फे ससून रुग्णालयाला ४० व्हीलचेअर, ४० स्ट्रेचरचे दान!

विश्रांतवाडी - कल्याणीनगर येथील एएम इन्फोवेब फाऊंडेशन आणि बंदे खुदा ट्रस्ट यांनी ससून रुग्णालयाला ४० व्हीलचेअर आणि ४० स्ट्रेचर भेट दिले आहेत. रुग्णालयात व्हीलचेअर आणि स्ट्रेचरच्या कमतरतेमुळे रुग्णांचे हाल होत असल्याची माहिती मिळताच फाऊंडेशनने तात्काळ पुढाकार घेत ही सुविधा उपलब्ध करून दिली. या समाजोपयोगी कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

फाऊंडेशन वर्षभर अनेक सामाजिक उपक्रम राबवते. या प्रसंगी एएम इन्फोवेबचे अध्यक्ष अली मर्चन्ट, संचालक आजम शेख, पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे, ससूनचे डीन एकनाथ पवार, अधीक्षक यल्लाप्पा जाधव, सामाजिक कार्यकर्ते महेबूब नदाफ यांच्यासह डॉक्टर आणि मान्यवर उपस्थित होते.




गेल्या काही महिन्यांपासून ससूनमध्ये व्हीलचेअर आणि स्ट्रेचर नादुरुस्त असल्याने रुग्ण आणि नातेवाइकांना त्रास सहन करावा लागत होता. काही वेदनादायक घटनांमध्ये रुग्ण किंवा मृतदेहांना बेडशीटमध्ये गुंडाळून वॉर्डात न्यावे लागले. गेट ते वॉर्डाचे अंतर जास्त असल्याने हा त्रास आणखी वाढला होता. ताडीवाला रोडचे सामाजिक कार्यकर्ते महेबूब नदाफ यांनी ही समस्या फाऊंडेशनच्या लक्षात आणून दिली. फाऊंडेशनने त्वरित प्रतिसाद देत गरज पूर्ण केली.एएम इन्फोवेब परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत हे मोलाचे कार्य केले. समाजासाठी काही करण्याची इच्छा असेल तर मार्ग आपोआप सापडतो, हे या उपक्रमाने दाखवून दिले. त्यांच्या या विधायक कार्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गावाच्या विकासासाठी मिळणार ‘गायरान जमीन’, महसूलमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

बावधन । प्रतिनिधी

मुळशी तालुक्यातील बावधन येथील शिल्लक गायरान जमीनीचा वापर गावच्या विकासासाठी व्हावा. त्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे निर्देश राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिल्याची माहिती माजी नगरसेवक किरण दगडे पाटील यांनी दिली. तसेच आत्तापर्यंत वाटप केलेल्या गायरान जागांचा उपयोग न झाल्यास त्यांना एक महिन्यांची नोटीस देण्याचे निर्देश दिल्याचेही दगडे पाटील यांनी सांगितले.



बावधन गावातील गायरान मिळकतीमधील बहुतांश क्षेत्र वेगवेगळया संस्था आणि विभागांना दिले. मात्र, ज्या हेतूने हे क्षेत्र दिले, त्यासाठी या जमीनीचा वापर झाला नाही. बहुतांश क्षेत्र अजूनही विकसित झालेले नाही. त्यामुळे हे सर्व क्षेत्र बावधन गावाच्या विकासासाठी आणि येथील रहिवासी यांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी परत मिळावे. तर उर्वरित गायरान क्षेत्राचे यापुढे कोणालाही वाटप होवू नये, अशी मागणी माजी नगरसेवक किरण दगडे पाटील आणि सरपंच पियुषा किरण दगडे यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. त्याबाबत महसुलमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महसूल अधिकारी व पुणे जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक पार पडली. यावेळी माजी नगरसेवक किरण दगडे उपस्थित होते. या बैठकीत हे दोन्ही निर्देश दिले असून, त्यामुळे लढ्यातील पहिले यश मिळाल्याचे दगडे यांनी सांगितले.

# महार रेजिमेंट मुख्यालयात बाबासाहेबांचा पुतळा उभारणार : रामदास आठवले

पुणे : भारतीय सैन्य दलाच्या महार रेजिमेंटच्या मध्य प्रदेश येथील मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्याशी बैठक घेऊन चर्चा करणार असल्याची माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली.



भारतीय सैन्य दलातील महार रेजिमेंट मध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व सैनिकांकडून गेल्या ४० वर्षांपासून रेजिमेंटच्या मुख्यालयात बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभा करावा अशी मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भामध्ये पुणे येथे झालेल्या बैठकीत रिपब्लिकन युवा मोर्चाचे नेते राहुल डंबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय स्तरावर याबाबत आंदोलन उभे करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

आज पाषाण येथील यशदा येथे नीती आयोगाच्या कार्यक्रमासाठी रामदास आठवले आले होते, यावेळी महार रेजिमेंट व रिपब्लिकन युवा मोर्चाच्या शिष्टमंडळाने आठवले यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन सादर केले होते.

यावेळी बोलताना आठवले यांनी आपण बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा या ठिकाणी उभारावा यासाठी आग्रही आहोत , यासंदर्भात राजनाथ सिंग यांची भेट घेऊन त्यांचेही मत सकारात्मक तयार करणार आहे. दरम्यान या प्रश्नावर गरज पडल्यास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचीही सुद्धा भेट घेऊ असे स्पष्ट आश्वासन आठवले यांनी दिले.

# मंचरला प्राथमिक शाळेजवळ आलेले बिबटे मोबाईल मध्ये कैद; शाळेला सुट्टी असल्याने मोठी दुर्घटना टळली

मंचर : मंचर शहराच्या कार्यक्षेत्रात असलेल्या लोंढेमळा वस्तीजवळ गुरुवारी (ता१०) सकाळी दहा वाजता बिबट्याचे दर्शन नागरिकांना झाले. काही नागरिकांनी बिबट्या उसाच्या शेतातून केळीच्या बागेत जात असताना काढलेला व्हिडिओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे. विशेष म्हणजे येथे असलेल्या प्राथमिक शाळेपासून ५० मीटर अंतरावर बिबट्या ची जोडी होती. पण आज महावीर जयंती ची सुट्टी असल्याने शाळा बंद असल्याने मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये सुरू आहे.



येथील शेतकरी ऋषिकेश अरुण लोंढे यांनी बिबट्याचा व्हिडिओ मोबाईल मध्ये काही केला आहे. त्यांनी सांगितले की ऊस तोडणी सुरू होती. ट्रॅक्टर ने शेतात नांगर सुरू होती. ऊस कामगार व ट्रॅक्टरच्या आवाजाने प्रथम एक बिबट्या परत तिथून गेला. त्यानंतर दुसरा बिबट्या पाहून मी मोबाईल मध्ये शूट केले.

गेल्या अर्धा दिवसापासून या भागात रात्री कुत्र्यांचा जोरदार भुंकण्याचा आवाज येत आहे. या भागातील नागरिकांना अलर्ट राहण्याविषयी सूचितकेले आहे. नर आणि बिबट्या अशा दोघांचा इथे वावर आहे. मंचर वनपरिक्षेत्र कार्यालयाने दोन्ही बिबटे जर बंद करण्यासाठी ताबडतोब पिंजरे लावावेत अशी मागणी श्री धर्मवीर संभाजी पतसंस्थेचे अध्यक्ष सिताराम लोंढे यांनी केली आहे.

वन खात्याने खबरदारीचा उपाय म्हणून या भागातील नागरिकांमध्ये जनजागृती सुरू केली आहे. शेतात काम करताना नागरिकांनी काळजी घ्यावी. येथील प्राथमिक शाळेत मुलांना सोडताना व पुन्हा घरी नेताना पालकांनी बरोबर राहावे. बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावण्याची कार्यवाही सुरू केली आहे.अशी माहिती मंचर वनपरिक्षेत्र कार्यालयाचे अधिकारी विकास भोसले यांनी दिली